# गृहिणी

## आरोग्य

✲ पपई व्हिटॅमिन सी ने भरपूर आहे. पिकलेल्या पपईत असलेल्या एंटी-ऑक्सिडेंट आणि फायबर शरीरात कोलेस्टेरॉल आणि रक्ताचे थक्के बनवण्यास रोखतो. बऱ्याच वेळा कोलेस्टरॉल हे हृदयघात आणि रक्तचाप वाढणे व हृदयाशी निगडित बऱ्याच आजारांचे कारण बनतो. रोजच्या खाण्यात पपईचा वापर तुम्हाला फायदा पोहोचवले. यात फार कमी कॅलरी असते जे लठ्ठपणा कमी करण्यास मदत करते. यात फायबरची मात्रा जास्त असल्यामुळे आतड्यांचे आरोग्य उत्तम राहते.

✲ मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

✲ दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

✲ मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

✲ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

✲ मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

✲ मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

✲ मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.

## पाककला

### काजूचे मोदक

**साहित्य** – अर्धी वाटी खोवलेले ओले खोबरे, १० काजूचे बारीक केलेले तुकडे, २ वाटी कणिक दुधात भिजवुन, १/२ वाटी पीठी साखर, २ वेलचीची पूड, १/२ वाटी तूप.

**कृती** – ओले खोबरे, काजूचे तुकडे, पीठी साखर, वेलची पूड एकत्र करुन सारण तयार करुन घ्या. भिजवलेल्या कणकेचे २१ छोटे गोळे करुन घ्या. एक गोळा घेऊन त्याची लाटी लाटा. साखर, खोबरे, विलायची, काजू तुकडे मिसळून तयार केलेले सारण भरा. मोदकाचा आकार देऊन तूपात मंद आचेवर तळा. रंग बदलला की काढून घ्या. हे मोदक २-३ दिवस चांगले राहतात.

## वास्तू

✲ घरातील उत्तर-पूर्व कोपऱ्यात हिरव्या रंगाचा बल्ब किंवा मेणबत्ती लावावी. यामुळे मुलांचे अभ्यासात लक्ष लागते.

✲ घराच्या दक्षिण भागात लाल रंगाचा बल्ब लावावा. यामुळे माता लक्ष्मी धन व वैभव देते. जर कलात्मक क्षेत्राशी आपला संबंध असेल, आपले उपजीविकेचे साधन असेल तर यात उन्नतीसाठी उत्तर-पश्चिमी भागात पांढऱ्या रंगाचा लाईट लावावा.

✲ दक्षिण दिशेस 'कर्मभावाची दिशा' मानले आहे. त्यामुळे घरात लहान-मोठी यंत्रसामग्री, वॉशिंग मशीन वा दुरुस्तीची उपकरणे ठेवायची असतील, तर ती आवर्जून आणि कटाक्षाने दक्षिण दिशेसच ठेवली पाहिजेत. अशा वस्तू ठेवण्यासाठी दक्षिणेचा मध्यापर्यंतचा भाग सर्वोत्तम होय.

## सौंदर्य

✲ चेहऱ्याची त्वचा तेलकट असल्यास टोमॅटोच्या रसात थोडा लिंबाचा रस पिळून त्याचा लेप चेहऱ्यावर लावावा.

## सल्ला

✲ वातामुळे सांधेदुखी आहे त्यांनी आवळा चूर्ण आणि एक चमचा गुळ एकत्र करावा. त्यात आल्याच्या तुकड्यासोबत सकाळ-संध्याकाळ सतत दोन महिने घ्यावे.

✲ झोपताना एक ग्लास गोड व गरम कोमट दुधामध्ये एक चमचा शुद्ध तूप टाकून मुलांना द्यावे.

✲ झोपताना एक ग्लास गोड व गरम कोमट दुधामध्ये एक चमचा शुद्ध तूप टाकून मुलांना द्यावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५

**पतेति, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, रेवती ०९।०६, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : अधिक श्रम करावे लागतील. पळापळ देखील अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या. धनाचा व्यय होईल.

**वृषभ** : कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कार्य करताना व वाहन चालवताना सावधान राहा.

**मिथुन** : आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. आपणास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल

**कर्क** : आज आपणास कठोर श्रम करावे लागेल. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**सिंह** : धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. मित्रांचे सहकार्य मिळाल्याने महत्त्वाची कार्य पूर्ण होतील.

**कन्या** : मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्नतेचे वातावरण राहील. नवीन संधी मिळतील.

**तूळ** : आरोग्याची काळजी घ्या. व्यस्तता जास्त राहील. कौटुंबिक विषयांमध्ये धनाचे व्यय होईल.

**वृश्चिक** : इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**धनु** : एखाद्या जिवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न करा.

**मकर** : चांगले भोजन व मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**कुंभ** : काळजीपूर्वक कार्य करा. नोकरीत असलेल्या व्यक्तींनी कार्यात सहकार्य घेऊन चालावे.

**मीन** : कार्यात विलंब झाला तरी यश मिळेल. नोकरीपेशा व्यक्तींनी इतर व्यक्तींची मदत घेऊन कामे करावी.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२४२ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | |
| ६ | | ■ | ७ | ८ | | | ■ |
| ९ | | १० | ■ | | ■ | ११ | १२ |
| | ■ | १३ | | | ■ | ■ | |
| १४ | १५ | | ■ | ■ | १६ | १७ | |
| ■ | | ■ | १८ | | | | ■ |
| १९ | | २० | | ■ | | ■ | २१ |
| २२ | | | ■ | २३ | | | |

शब्दगंध क्र. ७२४१ चे उत्तर



**आडवे शब्द :–** १) सामान; सामुग्री ४) एक धान्य; वरणा ६) तपास; शोध; ठावठिकाणा ७) वाताहत; बोजवारा ९) काळजीपूर्वक रक्षण; संगोपन ११) टिकाव १३) गायन करणारा; सिंगर १४) या सणाला सोने म्हणून आपट्याची पाने एकमेकांना देऊन शुभेच्छा दिल्या जातात १६) चिंतन; ध्यान १८) एक प्रकारचे रत्न १९) काही न खाण्याचे व्रत; लंघन २२) मानसिकता; मनातील विचार २३) गोंधळाची अवस्था; बोजवारा

**उभे शब्द :–** १) सर्वांना समान संधी असे अर्थकारण सांगणारा एक विचार २) मौज; मजा ३) बुद्धी ४) तलवार वगैरेची कापण्याची बाजू ५) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक ८) पापी लोकांचे मृत्यूनंतरचे स्थान १०) एक मोठे चर्मवाद्य १२) आकाश; नभ; अंबर १५) शेवट; अखेर; सांगता १६) समाधी; थडगे; कबर १७) वाकलेला; झुकलेला १८) त्वचेवरील काळा डाग; चामखीळ; तीळ १९) महादेवाची पत्नी; पार्वती २०) गंध; राहणे २१) आकडा; संख्या

# ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲ मुलांचे विश्व ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : नम्रतेचा परिणाम दूरवर फैलावतो; परंतु त्यासाठी पैचाही खर्च करावा लागत नाही. **– स्माइल्स.**

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## कुचल्याच्या बियांची पावडर जखमेवर लावावी का?

कुचला ही एक विषारी वनस्पती आहे. इंग्रजीत तिला स्ट्रिक्नॉस नक्स व्होमिका असे म्हणतात. पिकलेल्या फळातील बिया विषारी असतात. दोन सें. मी. व्यास व अर्धा सें. मी. जाडी असलेल्या या बिया करड्या रंगाच्या असतात व त्यांच्यावर लव असते. या बियांमध्ये स्ट्रीच्नीन, ब्रूसनीन व लोगॅनीन हे घटक असतात.

स्ट्रीच्नीनमुळे मध्यवर्ती मज्जासंस्थेच्या सर्व भागांच्या कामाला उत्तेजना मिळते. मेंदूतील काही पेशी उत्तेजित झाल्याने शरीरातील स्नायूंची प्रतिसाद देण्याची तीव्रता खूपच वाढते. साहजिकच ध्वनी, उजेड, हवेची झुळूक अशा गोष्टींमुळेही रुग्णाला झटके येतात. कुचल्याच्या बिया खाल्ल्याने (म्हणजे कवचासहित गिळल्याने) त्यांचे पचन न झाल्याने काहीही परिणाम होत नाही. याउलट जर बियांचे तुकडे खाल्ले वा बिया चावून खाल्ल्या, तर अत्यंत कडवट चव लागते. १५ मिनिटांतच विषबाधेची लक्षणे दिसून येतात. रुग्ण अस्वस्थ होतो. त्याचे स्नायू कडक होतात. त्यानंतर या विषबाधेतील विशिष्ट प्रकारचे झटके येऊ लागतात. श्वसन करता न आल्याने शरीर काळेनिळे होते. अत्यंत वेदनामय रीतीने मृत्यू येतो.

जखमेवर कुचल्यांच्या बियांची भुकटी लागल्याने एखाद्यावेळी स्ट्रीच्नीन हे विष शरीरात शोषले जाऊ शकते. शोषल्या गेलेल्या विषाचे प्रमाण जास्त असल्यास विषबाधाही होऊ शकते. तसेच कुचल्याच्या बियांची भुकटी जखमेला लावल्याने जखम भरून यायला काही मदत होत नाही. रक्तस्राव थांबण्यास थोडी मदत होऊ शकेल; पण या कामासाठी अत्यंत परिणामकारक अशी आधुनिक औषधे उपलब्ध असल्याने कुचल्याच्या बियांच्या भुकटीसारख्या विषारी पदार्थांचा वापर करणे केवळ अयोग्यच नव्हे, तर धोकादायकही आहे.

## लोभ

राजा कृष्णदेवरायाची आई अत्यंत धार्मिक होती. एके दिवशी तिने राजाला येऊन सांगितले की तिला दुसऱ्या दिवशी सकाळी ब्राह्मणांना पिकलेले आंबे दान करायचे आहेत. राजाने आपल्या सेवकांना तिच्यासाठी आंबे आणण्यास सांगितले. त्याच रात्री राजाच्या आईचा मृत्यू झाला. राजा खूप दुःखी झाला, पण त्याला आईची शेवटची इच्छा आठवली.

राजाने सर्व आवश्यक धार्मिक विधी पार पाडले. शेवटच्या दिवशी त्यांनी काही ब्राह्मणांना बोलावून त्यांच्या आईची शेवटची इच्छा पूर्ण करण्याचा मार्ग सुचवण्यास सांगितले. ब्राह्मण मात्र लोभी होते. चर्चेनंतर त्यांनी राजाला सांगितले की जर राजाने त्यांना सोन्याचे आंबे दान केले तरच त्यांच्या आईच्या आत्म्याला शांती मिळेल.

राजाने दुसऱ्या दिवशी सकाळी ब्राह्मणांना सोन्याचे आंबे देण्यासाठी बोलावले. तेनालीने हे ऐकले. त्याला ब्राह्मण लोभी असल्याचे लगेच समजले. त्यांना धडा शिकवण्यासाठी त्याने ब्राह्मणांना घरी बोलावले.

दुसऱ्या दिवशी राजाकडून सोन्याचे आंबे मिळाल्याने ब्राह्मणांना खूप आनंद झाला. तेनाली सुद्धा त्यांना काहीतरी चांगलं दान करेल या विचाराने ते तेनालीच्या घरी गेले. परंतु जेव्हा ते तेनालीच्या घरात गेले तेव्हा त्यांना तेनाली हातात गरम लोखंडी पट्टी घेऊन उभा असलेला दिसला.

ब्राह्मणांना धक्का बसला. तेनालीने त्यांना सांगितले की त्यांच्या आईचा संधिवातामुळे मृत्यू झाला होता. वेदना कमी करण्यासाठी गरम रॉडने तिचे शेकण्याची तिची इच्छा होती. त्यामुळे, आईच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी त्याला ब्राह्मणांचे पाय शेकायचे होते..

तेनालीची युक्ती ब्राह्मणांना समजली. लाज वाटून त्यांनी तेनालीला सोन्याचे आंबे परत केले आणि तेथून पळ काढला. तेनालीने सर्व सोन्याचे आंबे राजाला परत केले आणि राजाला ब्राह्मणांनी कसे फसवले हे सांगितले.

बोध : लोभी नसावे आणि जे आहे त्यात आनंदी राहावे.

# जीवन का अमृत (भाग १)



**कई किस्म के योग है ।** सबसे पहला योग जिसमें गुदा चक्र पर ध्यान केंन्द्रित किया जाता है । इंसान पहली अवस्था से शुरू होता है, फिर एक-एक चक्र को पार करते हुए ऊपर की मंजिलों तक पहुँचता है । वह बहुत लम्बा और कठिन रास्ता है, जो आज के समयानुसार उपयुक्त नहीं है क्योंकि हमारी जिंदगी बहुत छोटी है । संत-मत के महापुरुष, सुरत शब्द योग के महापुरुष, जैसे कि हुज़ूर बाबा सावनसिंहजी महाराज, परम संत कृपालसिंहजी महाराज और दयाल पुरुष संत दर्शनसिंहजी महाराज हैं, इन महापुरुषोंने सभी योग पद्धतियों की जाँच पडताल अच्छी तरह की थी और हमें बहुत ही आसान तरीका प्रभु को पाने का सिखा दिया, जो सनातन से सनातन और पुरातन से पुरातन है ।

इस विधि में हम आज्ञा चक्र पर अपना ध्यान एकाग्र करते हैं । आत्मा शरीर को इसी स्थान में छोड़कर ऊपर के मंडलों में जाती है । इन महापुरुषों ने हमें बताया कि निचले चक्रों पर ध्यान टिकाना समय को व्यर्थ करना है । नीचे के चक्रों पर ध्यान टिकाने के लिए इंसान का तन्दुरुस्त (स्वस्थ) होना ज़रूरी है, इसे छोटे बच्चे या बुजुर्ग नहीं कर सकते । सुरत-शब्द योग का रास्ता हमें इस जिंदगी में जीते जी एक नया जन्म देता है । इसी नए जन्म की बात गुरु अर्जनदेव जी महाराज कर रहे हैं :

### गुरू और परमात्मा

**कवन गुन प्रान पति मिलउ मेरी माई ॥**

उनका अर्थ दूसरे जन्म से है। यह जन्म तब होता है, जब हमारी अंतर की आँख खुल जाती है, हम किसी महापुरुष की शरण में पहुँच कर उसका संग करते हैं । जब हम नामदान के ज़रिये अंतर के मंडलों में रसाई करते हैं, तो सही माईनो में हमारा नया जन्म होता है । इस नए जन्म को कैसे पाया जाए ? हुज़ूर बाबा सावनसिंह जी महाराज और परम संत कृपालसिंह जी महाराज अपने सत्संगों में चीन के बादशाह की कहानी सुनाया करते थे। चीन में कई कलाकार बाहर के देशों से आए और उन्होंने राजा से कहा कि हम अपनी कलाकृति आपको दिखाना चाहते हैं। बादशाह ने एक बड़े हाल में एक दीवार पर उन्हें अपनी कला दिखाने के लिए कहा । बादशाह ने अपने देश के कलाकारों को बुलाकर उनसे भी चित्रकारी करने के लिए कहा, ताकि यह देखा जाए कि किसकी कृति श्रेष्ठ है। चीनी कलाकारों ने सोचा कि विदेशी कलाकार हम से बेहतर हैं, हम कैसे इनका मुकाबला करेंगे? उन्होंने मिलकर सोच-विचार किया, कि हम कुछ ऐसा बनायें, जो बहुत अच्छा हो। उनमें से एक बुजुर्ग कलाकार ने एक सुझाव दिया कि हम भी दूसरी दीवार पर कलाकृति करना चाहेंगे । राजाने उस हॉल के बीच में एक परदा लगवा दिया, ताकि दोनों तरफ़ के कलाकार एक दूसरे की कलाकृति न देख सकें । राजा ने एक महीने का समय निश्चित कर दिया और कहा कि एक महीने बाद यह निर्णय होगा कि किसकी कलाकृति बढिया है । दोनों तरफ के कलाकारों ने काम शुरू कर दिया ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

संसार में हरेक मनुष्य चाहता है कि मेरा जीवन सात्विक हो, मैं अच्छे कार्य करूँ, महान बनूँ और मेरे जीवन में शान्ति बनी रहे। परन्तु इच्छा होना एक बात है और उस इच्छा को साकार करने के लिए पुरुषार्थ करना दूसरी बात है। देखने में आता है कि लोग चाहते हैं कुछ और, करते हैं कुछ और चाहते हैं । शान्ति, परन्तु परिस्थिति वश, संस्कार वश कर्म ऐसे कर बैठते हैं जिस कारण उनके अपने और दूसरों के जीवन में अशान्ति पैदा हो जाती है। चाहते हैं स्नेह और प्रेम लेकिन बात ऐसी कर लेते हैं जिससे गलतफहमी, मनमुटाव, संघर्ष और नफरत को बढ़ावा मिलता है। चाहते हैं कि स्वास्थ्य अच्छा हो परन्तु सात्विक अन्न की कमी के कारण शरीर में स्वास्थ्य नाशक, रोगोत्पादक तथा उत्तेजनात्मक विषैले तत्व इकटे होने लगते हैं, जो न केवल शरीर के लिए हानिकारक होते हैं बल्कि मानसिक सन्तुलन को भी बिगाड़ते हैं, निर्णयशक्ति को विचलित कर देते हैं, मानसिक आवेग को अनियंत्रित, असन्तुलित, अमर्यादित या दिशा भ्रष्ट कर देते हैं। इसलिए मनुष्य के आहार का उसके आचार, विचार और व्यवहार से गहरा सम्बन्ध है।

### आज्ञा चक्र

प्राचीन काल से यह कहा जाता है कि अन्न का मन पर प्रभाव पड़ता है और मन का स्वास्थ्य व रोगों से गहरा सम्बन्ध है । कहते हैं जैसा अन्न वैसा मन, जैसा मन वैसा तन। इसलिए तनावमुक्त, व्यसनमुक्त, चरित्र सम्पन्न जीवन जीने के लिए भोजन का अकथनीय महत्व है । सभी मनुष्यों का लक्ष्य यही है कि हम शान्त, शीतल और सात्विक वृत्ति को धारण कर सुखमय व आनन्दित जीवन जिये और इस लक्ष्य तक पहुँचने के लिए मन को वश करना आवश्यक है, मन को वश करने के लिए हमें अन्न की परहेज पर ध्यान देना बहुत जरूरी है।

अनाज का उत्पादन किस विधि से हो, इस पर विचार करना आवश्यक है । विश्व भर में खेती में अनाज, फल की उत्पादकता के लिए विविध प्रयोजन किये जाते हैं, जैसे –

**१) नैसर्गिक खेती पद्धति :** इसमें जमीन की जुताई नहीं की जाती है, हल नहीं चलाया जाता है। किसी भी प्रकार की खाद बाहर से लाकर नहीं डाली जाती है। निराई, खरपतवार निकालते समय कोई हथियार तथा दवाइयों का इस्तेमाल नहीं किया जाता है । खेती में से अनाज निकालने के बाद जो अनावश्यक (वेस्ट) भाग है उसे जमीन पर आच्छादित करते हैं और दल्हनी (द्विदल) फसल (जैसे कि मूंग, उड़द, मूंगफली, सोयाबीन आदि) लेते है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# हसा आणि शतायुषी व्हा!

आई : अरे देवा, मीठ संपलं वाटतं. काय एकेक ताप.

राजू : अग आई, काळजी करू नकोस. भाजीत टुथपेस्ट टाक ना!

आई : मेल्या, काय वाट्टेल ते सांगू नकोस.

राजू : खोटं नाही सांगत आई, जाहिरातीत सांगत नाहीत का– 'इसमे नमक है'

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✲ अत्यंत गरीब देशांमध्ये प्रथम असलेला देश कोणता?

– दक्षिण सुदान

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

संध्याकाळी सहा ते सात या वेळेमध्ये रात्रीचे जेवण करून घ्यावे. रात्रीचे जेवण हे सकाळ प्रमाणेच करावे. फक्त पोळीऐवजी नाचणी, ज्वारी, बाजरीची भाकरी ऋतुनुसार खावी. या जेवणामध्ये भाकरी-भाजी ऐवजी बदल म्हणून थालीपीठ, पराठा खावा. रात्री झोपताना एक ग्लासभर दूध प्यावे. किंवा भाज्यांचे सूप प्यावे. सकाळच्या जेवणात नुसत्या पोळीऐवजी पालेभाज्या घालून पराठा करावा.

अशा पद्धतीने सर्वांनी आपल्या प्रकृतीला अनुसरून आहार घ्यावा. सहसा सकाळचे जेवण जास्त केले, तरी आरोग्याला त्रास होत नाही, कारण त्या वेळी सूर्य प्रखर असतो. परंतु रात्रीचे जेवण हे सूर्यास्तामुळे हलके करावे, कारण शरीरातील पाचकाग्नीची क्षमता कमी झालेली असते. यदाकदाचित जर जेवण करण्यास खूप उशीर झाला, तर फक्त सूप प्यावे. अशा पद्धतीने आहाराचे नियम पाळले, तर आरोग्य नक्कीच चांगले राहील. कारण चुकीच्या आहारातूनच व्याधी निर्माण होतात. खरेतर हे सर्व नियम अगदी क्षुल्लक वाटतात. परंतु हे नियम व्यवस्थित पाळले, तर काही दिवसांतच लक्षात येईल, की आरोग्यामध्ये सुधारणा होत आहे. आम्लपित्त, रक्तदाब अशा प्रकारच्या व्याधी उद्भवत नाहीत. आयुर्वेदीय आहार दृष्टिकोन फार मोठा आहे. परंतु आरोग्याच्या दृष्टीने आठ विधिविशेषायतने वापरून आहार संकल्पना मांडण्याचा थोडक्यात प्रयत्न केला आहे. आरोग्याच्या दृष्टिकोनातून विचार करताना स्वास्थ्य टिकून राहावे व आजार झालाच तर तो लवकर बरा व्हावा, याकरिता ऋतुनुसार आहार-विहार यांचा विचार करणे गरजेचे आहे. कारण सहसा रोगांची लागण ही एक ऋतू संपून जेव्हा दुसरा ऋतू सुरु होतो, अशा ऋतुसंधिकालामध्ये लवकर होते. जर या ऋतूंची शास्त्रोक्त माहिती व त्या ऋतूत आचरणात आणावयाचा आहार-विहार याबद्दलचे ज्ञान मिळाले, तर प्रत्येकाला स्वतःचे आरोग्य चांगले सांभाळता येईल.

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००




महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर, जिल्हा फुटबॉल संघटना, शांतीकुमार फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन व आय लव्ह नगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील पहिल्या राज्यस्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आदी.

# सुब्रतो कपमधून ऑलम्पिकसाठी फुटबॉलपटू घडावेत

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे प्रतिपादन

नगर – सुब्रतो मुखर्जी राज्यस्तर फुटबॉल कप ही राज्यातील महत्त्वपूर्ण फुटबॉल स्पर्धा आहे. राज्यभरातून आलेल्या ८ विभागातील विजेत्या खेळाडूंमधून उत्कृष्ट फुटबॉल खेळाचे प्रदर्शन पाहण्याची संधी सर्व खेळाडूंना मिळणार आहे. या स्पर्धेतून जागतिक ऑलिंपिक स्पर्धे साठी फुटबॉलपटू घडावेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर, जिल्हा फुटबॉल संघटना, शांतीकुमार फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन व आय लव्ह नगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील पहिल्या राज्यस्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया बोलत होते.

यावेळी उद्घाटक आमदार संग्राम जगताप, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य नोएल पारगे, रजिस्ट्रार हेमलता भिंगारदिवे, सचिव प्रदीप जाधव, खलील सय्यद, सोवियो वेगास, ऑलम्पिक संघटनेचे शैलेश गवळी, धीरज मिश्रा, फुटबॉल असोसिएशनचे सचिव रोनक फर्नांडिस आदी उपस्थित होते.

उद्घाटक आमदार संग्राम जगताप यांनी उद्घाटनपर भाषणात प्रतिपादन केले की जिल्ह्यातील पहिल्या–वहिल्या राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेमुळे या खेळाची कौशल्ये व गुणवत्तेची देवाण–घेवाण होणार आहे. शालेय स्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू आज या स्पर्धेमध्ये सहभागी झालेले आहेत. या खेळाडूंनी जीवनात सातत्य दाखवल्यास त्यांच्या गळ्यात निश्चितच अनेक सुवर्णपदके चमकतील.

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या बँडच्या माध्यमातून पाहुण्यांचे स्वागत झाले. या स्पर्धेकरिता १५ वर्ष व १७ वर्षे वयोगटातील मुलांचे महाराष्ट्रातील ८ विभागातील २५६ खेळाडू ३२ संघ व्यवस्थापक व मार्गदर्शक आणि २५ पंच सहभागी झाले होते. फुटबॉल संघाच्या संचलन उपक्रमातून पाहुण्यांना अभिवादन झाले. सर्व विभागांच्या खेळाडूंच्या एकजुटीतून पाहुण्यांच्या हस्ते स्पर्धेची क्रीडा ज्योत प्रज्वलित झाली.

संयोजन समितीचे वतीने प्रमुख अतिथींचा सत्कार झाल्यानंतर प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी प्रतिपादन केले की फुटबॉल हा जागतिक खेळ असून महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात नवीन खेळाडूंची पिढी या खेळाकडे आकर्षित होत आहे. विविध जिल्ह्यातून गुणवत्तेने पुढे आलेले खेळाडू निश्चितच देशाचे उज्वल भविष्य आहेत.

शंभूसूर्य प्रतिष्ठानच्या वतीने शिवकालीन मर्दानी खेळ व शस्त्रास्त्रांचे प्रात्यक्षिक झाले. राष्ट्रीय खेळाडू स्वराज सावंत याने खेळाडूंना क्रीडा संघभावनेची शपथ दिली.

आकाशात विविधरंगी फुगे सोडवून स्पर्धेचे उद्घाटन झाले. शुभारंभाचा सामना अमरावती व कोल्हापूर या संघांमध्ये खेळवला गेला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले. क्रीडा अधिकारी भाऊराव वीर यांनी स्वागत केले. क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे यांनी आभार मानले.

अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे व क्रीडा प्रबोधिनी आदी विभागातील संघ या स्पर्धेसाठी दाखल झाले असून ही स्पर्धा अहमदनगर महाविद्यालयाच्या प्रशस्त मैदानावर खेळवली जाणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडरे, रमेश जगताप याबरोबरच फुटबॉल संघटनेचे पंच अभिषेक सोनवणे, संकेत बनसोडे, मनीष राठोड, सुमित राठोड, व्हिक्टर जोसेफ, जोनाथन जोसेफ, सचिन पाथरे, अभय साळवे, जेवियर स्वामी, राजेश अँथनी आदींनी परिश्रम घेतले.

# आकाशवाणी श्रोता संमेलनात १९ ऑगस्टला यादवराज फड यांची 'भक्ती संध्या मैफिल'



नगर – आकाशवाणी श्रोता संमेलनात १९ ऑगस्ट रोजी सायं. ६ वा. भोसले लॉन अहिल्यानगर येथे किराणा घराण्याचे प्रतिभावंत गायक पं. यादवराज फड यांचा भक्ती संध्या हा अभंगवाणीचा कार्यक्रम आयोजित केला. पं. यादवराज फड यांनी देशात दिल्ली, कोलकाता, चंदिगढ, ग्वाल्हेर, पणजी, बेळगाव, बेंगलोर, राजकोट, इंदोर, बडोदा, रायपूर, हैद्राबाद इत्यादी ठिकाणी मैफिली गाजवल्या आहेत. ख्याल, ठुमरी, भजन, नाट्यगीत असे प्रभुत्वाने चौफेर सादरीकरण करतात, कार्यक्रमात जास्तीत जास्त स्वतः संगीतबद्ध केलेल्या रचना सादर करणे हे त्यांचे खास वैशिष्ट्य आहे.

त्यांना हार्मोनियम मकरंद खरवंडीकर, तबला शेखर दरवडे, मृदंग आसाराम साबळे, टाळ किरण जोशी, स्वरसाथ महेश खोपटीकर हे साथसंगत करतील, १९ आणि २० ऑगस्ट असे दोन दिवस चालणाऱ्या संमेलनात विविध कार्यक्रम होणार आहेत, मुख्य आकर्षण पं. यादवराज फड यांच्या भक्ती संध्या या कार्यक्रमाचे आहे, याचा लाभ घ्यावा असे संयोजकांच्या वतीने कळवले आहे.

# अहिल्यानगरकरांसाठी १४ ऑगस्ट रोजी 'कृष्णामृत'ची समधूर सांगितिक मेजवानी

### कृष्णाची भजनं व गितांचे होणार सादरीकरण



सौ. सन्मिता शिंदे गिरीराज जाधव सौ. रश्मी गंधे

नगर – कृष्णाष्टमीच्या पूर्वसंध्येला १४ ऑगस्ट रोजी नगरकरांना कृष्ण भजनाची व गितांची 'कृष्णामृत' ही सुमधूर सांगितिक मेजवाणी मिळणार आहे. नगर मधील युवा गायक गिरीराज जाधव यांच्यासोबत 'सूर नवा ध्यास नवा'च्या विजेत्या सन्मिता धापटे–शिंदे आणि गायिका रश्मी गंधे हे या कार्यक्रमाचे सादरीकरण करणार आहे.

नगरमध्ये होत असलेल्या अनेक गितांच्या कार्यक्रमांचा आस्वाद नगरकर भरभरून घेत असतात. मात्र, भगवान श्रीकृष्णावरील भजन व गितांचा हा आगळावेगळा कार्यक्रम रसिकांना अनुभवता येणार आहे. सावेडीतील माऊली सभागृहात १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाचे निवेदन मुंबई येथील कवयित्री सिद्धी ढोके करणार आहेत, तर दर्जेदार वाद्यवृंद या कलाकारांना साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमासाठी सर्वांना मोफत प्रवेश असून, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य असेल. कृष्णभक्तीमध्ये लीन होण्यासाठी रसिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन गिरीराज जाधव यांनी केले आहे.

# सीबीएसई साऊथ झोन स्पर्धेत पार्थ दातरंगे याला ब्रॉन्झ पदक



नगर – सीबीएसई साऊथ झोन जूडो स्पर्धेत पार्थ आनंद दातरंगे याने ब्रॉन्झ पदक पटकावून जिल्ह्याचा मान उंचावला आहे. ही स्पर्धा लोटस इंग्लिश मीडियम स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज, शिर्डी येथे पार पडली.

स्पर्धेत –३० किलो वजनी गटात दमदार खेळ करत पार्थने पराक्रम गाजवला. तो उद्धव अकॅडमी (पॉवर्ड बाय श्री चैतन्य टेक्नो स्कूल, कल्याण रोड) येथे इयत्ता चौथीचा विद्यार्थी असून, यंग मेन्स जूडो क्लबमध्ये नियमित सराव करतो. या यशामागे प्रा. संजय धोपावकर यांचे मार्गदर्शन लाभले असून, शालेय क्रीडा शिक्षक सुनील मोहिते, आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य धोपावकर, राष्ट्रीय खेळाडू गणेश लांडगे, शुभम दातरंगे, फयाज सय्यद, विनोद बुरला व अथर्व नरसाळे यांचेही योगदान आहे.

शाळेच्या प्राचार्या एन. सी. मॅडम यांनी पार्थच्या यशाचे मनापासून कौतुक करत, ही केवळ पार्थचीच नव्हे तर आमच्या शाळेची आणि जिल्ह्याचीही अभिमानाची बाब आहे असे मत व्यक्त केले.

या यशानंतर पर्जन्येश्वर महादेव मंदिर येथे पार्थचा सत्कार करण्यात आला.

# शिक्षकांना कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करा

### विधान परिषदचे सभापती प्रा. राम शिंदे यांना प्रसाद शिंदे यांची निवेदनाद्वारे मागणी

नगर – महाराष्ट्रातील शिक्षक, शिक्षकेतरांना कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करावी यासंदर्भात स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना निवेदन दिले.

प्रा. शिंदे जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठकीला आले असता त्यांची भेट घेऊन प्रसाद शिंदे यांनी कॅशलेस मेडिक्लेम योजनेबद्दल लक्ष वेधले. कॅशलेस मेडिक्लेम योजना शिक्षक शिक्षकेतर वर्गासाठी अत्यंत आवश्यक बनली आहे. कॅशलेस मेडिक्लेम योजना शिक्षकांना लागू झाल्यावर शिक्षक बंधू भगिनींना मोठा आधार मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जर एखादा शिक्षक आजारी पडला तर त्याला स्वतःच्या खिशातून खर्च करावे लागते. वेळप्रसंगी सोसायटीचे कर्ज काढून दवाखान्याचा खर्च भागवावा लागतो. बऱ्याच वेळा शिक्षकांकडे उपचारासाठी पैसे नसतात पैसे उभे करण्यात कुटूंबातील व्यक्तीना खूप त्रास सहन करावा लागतो. शासनाच्या नियमानुसार उपचार पूर्ण झाल्यावर फाईल जमा करू खर्च दिला जातो. पण ही प्रक्रिया खूप वेळ खाऊ असल्याने शिक्षक वर्ग आर्थिक संकटात सापडतो. यामध्ये बदल होणे अपेक्षित आहे. येणाऱ्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावे आणि शिक्षकांना कॅशलेस मेडिक्लेम योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी प्रसाद शिंदे यांनी केली आहे. याप्रसंगी स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



महाराष्ट्रातील शिक्षक, शिक्षकेतरांना कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करावी यासंदर्भात स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना निवेदन दिले.

# नगरच्या सानिका झावरे हिने वैद्यकीय शिक्षण घेताना अथक परिश्रमातून मिळविली भरतनाट्यमची पदविका



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील भोंद्रे (ता.पारनेर) गावातील कु. सानिका सुनिल झावरे हिने वैद्यकीय शिक्षण घेत असताना भारतीय संस्कृती जोपसण्याचा प्रयत्न करत अथक परिश्रम घेवून भरतनाट्यम मधील आरंगेत्रम ही पदविका मिळविली आहे. नवी मुंबई याठिकाणी नुकताच हा पदवीदान सोहळा पार पडला आहे.

सानिका वयाच्या चौथ्या वर्षांपासून पासून भरतनाट्यम शिकत असून ती सध्या नवी मुंबई येथील तेरणा डेंटल कॉलेजमध्ये बीडीएस ला तिसऱ्या वर्षाला शिकत असून कॉलेजमध्ये दोन्ही वर्षी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे.याशिवाय ती तेरणा डेंटल कॉलेजचे प्रतिनिधित्व करत आहे.

डेंटल शिक्षण चालू असतानाही तिने भरतनाट्यम शिकणे ही सोपी गोष्ट नाही. तिचे गुरु श्रीमती अपेक्षा निरंजन आणि श्रीमती मिताली हसबनीस यांच्या मार्गदर्शनाखाली तिने भरतनाट्यम आरंगेत्रम पूर्ण केले आहे. तसेच तिने गुरु गायत्री सुब्रमण्यम यांच्या मार्गदर्शनाखाली १० वर्षाचा डिप्लोमा इन परफॉरमिंग आर्ट्स डान्स– भरतनाट्यम हा कोर्स पूर्ण केला आहे आणि भरतनाट्यमची पदविका उत्तीर्ण झाली आहे.

तिने सलग चार तास तेरणा ऑडिटोरियम(नवी मुंबई) येथे भरतनाट्यम नृत्य करुन उपस्थित जवळपास ५०० ते ६०० प्रेक्षकांची मने जिंकली आहे. वादक, गायक, गुरु डॉ. सुचिता भिडे– चापेकर आणि गुरु डॉ. सुमन बदामी यांच्या हस्ते भरतनाट्यम पदवीदान सोहळा पार पडला. गुरु अलका लाझमी यांचे देखील मार्गदर्शन तिला मिळाले.

सानिकाने अलिकडेच तिरुपती बालाजी समोर भरतनाट्यमचे सुमारे तासभर सादरीकरण केले. त्यासाठी तिच्या गुरूवर्या गेल्या चार वर्षे प्रयत्नशील व कार्यरत होत्या. तिने नुकताच नवी मुंबईचा महापौर चषक सुद्धा जिंकलेला आहे. या सर्व अथक प्रवासात तिला जे यश मिळाले आहे या यशामाघील श्रेयाचे खरे मानकरी आई सौ.धनश्री सुनिल झावरे या आहेत.

पुणे, नवी मुंबई तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, नगर, श्रीगोंदा तालुक्यातील सर्व नातेवाईक,मित्रपरिवार, स्नेहीजनांनी तिच्या या अथक प्रवासाचे कौतुक आणि अभिनंदन केले तसेच कुमारी सानिकास पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. सानिका ही पारनेर तालुक्यातील भोंद्रे गावातील सौ.तारामती व भाऊसाहेब आनंदाराव झावरे आणि सौ. यमुना व तबाजी गंगाराम पुजारी (रा. पारनेर, ह.मु.निघोज) यांची नात आणि सौ.धनश्री व सुनिल भाऊसाहेब झावरे यांची कन्या आहे.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त अल–करम हॉस्पिटलमध्ये १५ ऑगस्टला औषधोपचारसह मोफत सर्वरोग निदान शिबीराचे आयोजन



नगर – अल–करम हॉस्पिटलच्या वतीने भारताच्या स्वातंत्र्य दिवसानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते ०२ वाजे पर्यंत अल करम हॉस्पिटल, इंगळे मेडिकल जवळ, रविराज आर्केड किंग्ज् गेट रोड, अहमदनगर येथे मोफत सर्वरोग निदान उपचार व औषधांसह शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याचे तौफिक तांबोळी यांनी सांगितले.

यामध्ये मोफत ओ.पी.डी., ई.सी.जी., शुगर तपासणी, उपलब्धते नुसार औषधे दिली जाईल. सोनोग्राफी, ऐक्स रे, लॅब टेस्ट ईत्यादीवर ३०% ते ५०% पर्यंत सवलत दिली जाईल असे डॉ. जहीर मुजावर यांनी सांगितले.

या शिबिरात जनरल सर्जन (हार्निया, अपेंडीक्स व इतर सर्व शस्त्रक्रिया), कार्डियाक (कॅथलॅब, अॅन्जीओप्लास्टी), युरोलॉजी (डायलिसीस, किडनीस्टोन, प्रोस्टेट सर्जरी), मेडिकल (डायबेटिस, ह्यदयाचे आजार, स्ट्रोक, ब्लडप्रेशर), आर्थोपेडिक (सांधेदुखी, पाठदुखी, सांधे प्रत्यारोपन) स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र (वंध्यत्व निवारण, वेदनाविरहीत प्रसुती), बालरोग व नवजात रोगशास्त्र ऑन्कोलॉजी (सर्जन व किमोथेरपी), पॅथॉलॉजी रेडिओलॉजी सिटीस्कॅन आदी आजारांची तपासणी डॉ. जहीर BAMS, MSc, PhD,Medical Pharmacology, डॉ. नजमा जहीर BUMS, CCH, CGO (स्त्रीरोग / वंध्यत्व निवारण), डॉ. जैनब पटेल M.B.B.S., M.S.(Surgeon), डॉ.अशपाक पटेल M.B.B.S., MD.(Medicine) हे डॉक्टर करणार असल्याचे डॉ. अशपाक पटेल यांनी सांगितले. याचा फायदा घ्यावा व अधिक माहितीसाठी या नंबर वर ९८६०७०८०१६ /९९२१९९१४९२/०२४१–२४२३३३३ संपर्क करावे, असे आवाहन शेरअली शेख यांनी केले आहे.

# अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या शहर अध्यक्षपदी ब्रिजेश ताठे



नगर – शहरातील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या शहर अध्यक्षपदी ब्रिजेश ताठे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगनराव भुजबळ व कार्याध्यक्ष समीर भुजबळ यांनी अहिल्यानगर महानगर अध्यक्षपदी ताठे यांची नियुक्ती जाहीर केली आहे.

ब्रिजेश ताठे हे सामाजिक चळवळीत सक्रीय असून, महात्मा फुले समता परिषदेशी जोडले गेलेले आहे. समाजाचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा सातत्याने पुढाकार असतो. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना समता परिषदेवर पदाच्या माध्यमातून सामाजिक कार्यासाठी संधी देण्यात आली आहे.

ना. छगनराव भुजबळ व मा.खा.समीर भुजबळ, आ. पंकज भुजबळ, ओबीसी महामंडळाचे माजी अध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, रवी सोनवणे व प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी यांनी जो विश्वास दाखवला आहे, तो मी माझ्या कामातून सार्थ करून दाखवेल. सर्व ओबीसी बहुजन समाजाला सोबत घेऊन शहरात काम करणार आहे. लवकरच शहराची प्रभाग निहाय बैठक घेऊन कार्यकारणी व शाखा स्थापन करण्यात येणार आहेत. शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार तळागाळात रुजविण्यासाठी व ओबीसी बहुजन समाजाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी समता परिषद कटिबद्ध राहणार असल्याचे ताठे यांनी सांगितले.

# अखिल भारतीय महात्मा फुले समता परीषद महानगर कार्याध्यक्षपदी अभिषेक चिपाडे



नगर – अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद अध्यक्ष छगनराव भुजबळ व समता परिषद कार्याध्यक्ष समीर भुजबळ यांनी अहिल्यानगर महानगर कार्याध्यक्षपदी अभिषेक चिपाडे यांची नियुक्ती केली आहे. तसेच प्रदेश चिटणीसपदी अंबादास गारुडकर, अनिल निकम व जिल्हाध्यक्षपदी सुभाष लोंढे व महानगर अध्यक्षपदी ब्रिजेश ताठे यांची नियुक्ती केली आहे.

अभिषेक चिपाडे यापूर्वी मिलिटरी इंजिनियरिंग सर्विसेस (संरक्षण खाते) येथे सर्विस करत असताना एम.इ.स एम्प्लॉईज युनियन पुणे अंतर्गत (कार्यक्षेत्र –पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बेळगाव व सामरा) एरिया युनियनच्या उपाध्यक्षपदी व अहिल्यानगर शाखेचे चेअरमन पदी व इतर पदावर गेले तीस बत्तीस वर्षे कार्यरत होते. तसेच दि सदर्न कमांड एम.इ.स एम्प्लॉयीस क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड पुणे (कार्यक्षेत्र– भारतातील १३ राज्यांमध्ये) चेअरमन, व्हाईस चेअरमन पदी कामकाज पाहिले आहे. सर्विसमध्ये असताना अहिल्यानगर, पुणे, गुजरात, राजस्थान कामगार संघटनेमध्ये, कामगार क्षेत्रांमध्ये मोठे कार्य केले असता मोठा जनसंपर्क निर्माण केला.



प्रा.राम शिंदे यांनी मंगळवारी अहमदनगर मर्चंटस् बँकेच्या मार्केटयार्ड येथील मुख्यालयास सदिच्छा भेट दिली बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी स्वागत करून सत्कार केला.

# हस्तीमलजी मुनोत यांच्यासारख्या निष्कलंक नेतृत्वामुळे मर्चंटस् को–ऑप. बँकेची मोठी भरारी : सभापती राम शिंदे

नगर – नगर जिल्ह्याने सहकारातून समृध्दीकडे हा मंत्र देशाला दिला. सहकारी बँकिंगमुळे अनेक लहान मोठे व्यावसायिक, व्यापारी, उद्योजक उभे राहिले. या क्षेत्रात अहमदनगर मर्चंटस् बँक मागील ५२ वर्षांपासून सर्वोत्कृष्ट बँकिंग सेवा देत नगरच्या अर्थकारणात महत्वाची भूमिका बजावत आहे. हस्तीमल मुनोत यांच्यासारख्या निष्कलंक व दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली बँकेने घेतलेली भरारी कौतुकास्पद आहे. आताच्या काळात इतर बँकांसाठी मर्चंटस्चा कारभार आदर्शवत आहे. सहकाराचा मूलमंत्र तंतोतंत अंमलात आण्याचे काम मर्चंटस् बँकेने केले. त्यामुळे लोकांचा सहकारावरील विश्वास कायम राहण्यास मदत झाली आहे. विश्वसनीयता व प्रामाणिक सेवा या बँकेचे वैशिष्ट्ये आहे, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले.

प्रा.राम शिंदे यांनी मंगळवारी अहमदनगर मर्चंटस् बँकेच्या मार्केटयार्ड येथील मुख्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी ते बोलत होते. सभापती प्रा.राम शिंदे यांचे बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी स्वागत करून सत्कार केला. यावेळी जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, बँकेचे संचालक अनिल पोखरणा, आनंदराम मुनोत, संजय चोपडा, सी.ए.मोहन बरमेचा, संजय बोरा, किशोर गांधी, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड, विजय कोथंबिरे, सुभाष भांड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी, जॉइंट सीईओ नितीन भंडारी आदी उपस्थित होते. जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांचा सत्कार अनिल पोखरणा यांनी केला.

प्रा.शिंदे पुढे म्हणाले, हस्तीमल मुनोत यांच्यासारख्या नेतृत्वामुळे बँकेला श्येड्डुल्ड बँकेचा दर्जा मिळाला आहे. बँकेला काही हितचिंतकांकडून त्रास देण्याचा प्रयत्न होतो. पण लोकशाहीत सत्ताधारी पक्षाबरोबरच विरोधी पक्षही असला पाहिजे. त्यामुळे हितचिंतकांची एवढी काळजी करण्याची गरज नाही. आपण मनाने प्रामाणिक व स्वच्छ असलो तर कोणी विनाकारण त्रास दिला तरी त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे.

संचालक अनिल पोखरणा स्वागत करताना म्हणाले की, विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या सभापतीपदी झालेली निवड जिल्ह्यासाठी तसेच आमच्यासाठीही अभिमानास्पद आहे. त्यांनी स्वकर्तृत्वाने मोठी भरारी घेतली असून बँकेशी संबंधित विषयांत त्यांचे नेहमीच सहकार्य असते. त्यांचे बँकेत स्वागत करताना विशेष आनंद होत आहे.

चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, रिझर्व्ह बँकेने नुकताच मर्चंटस बँकेला श्येड्युल्ड बँकेचा दर्जा दिला आहे. बँकेचे रिझर्व्ह फंड एनपीएच्या दुप्पट आहे. मागील आर्थिक वर्षी बँकेला ३९ कोटी रुपयांचा नफा झाला होता. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त बॅकेने सभासदांना ५१०० रुपयांची मुदत ठेवीची भेट देण्याचे ठरवले आहे. काही हितचिंतक बँकेविषयी तक्रारी करत असतात. परंतु त्यांच्या हे लक्षातयेत नाही की रिझर्व्ह बँकेने सर्व गोष्टी तपासूनच श्येडूल्ड बंकेचा दर्जा दिलेला आहे. सभापती शिंदे हे स्वत: बँकेचे सभासद आहेत याचा आनंद आहे. त्यांची विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या सभापतीपदी झालेली निवड कौतुकास्पद आहे.

यावेळी संचालक संजीव गांधी, संजय चोपडा, किशोर मुनोत यांनीही सभापती प्रा.शिंदे यांच्या कार्यशैलीचे कौतुक करीत त्यांचे नेहमीच सहकार्य लाभत असल्याचे आवर्जून नमूद केले. शेवटी संचालक संजय बोरा यांनी आभार मानले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल हे सर्व स्तरातील रुग्णांकरीता एक वरदान

## अजित बोथरा यांचे प्रतिपादन



राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनव्दारा संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड हार्ट सर्जरी सेंटरमध्ये प्लॅस्टिक सर्जरी तपासणी व उपचार शिबाराचे उद्घाटन अजित बोथरा यांच्या हस्ते झाले. (छाया – उदय जोशी)

## प्लॅस्टिक सर्जरी तपासणी व उपचार शिबिराला रूग्णांचा मोठा प्रतिसाद

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटल सातत्याने गरीब – गरजू रुग्णांकरीता मोफत आरोग्य तपासणी शिबीरे घेतात, त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत आहे. ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशन हॉस्पिटलच्या माध्यमातून करीत आहे. या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा गरजूंना लाभ व्हावा, यासाठी हॉस्पिटलने आता यापुढेही अशीच सेवा सुरु ठेवावी, असे प्रतिपादन अजित बोथरा यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनव्दारा संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड हार्ट सर्जरी सेंटरमध्ये प्लॅस्टिक सर्जरी तपासणी व उपचार शिबाराचे उद्घाटन अजित बोथरा यांच्या हस्ते झाले. यावेळी सौ. प्रतिभा बोथरा, अमन बोथरा, सौ. आकांक्षा बोथरा, सतिश बोथरा, संतोष बोथरा, अभय दर्डा, शिरीष दर्डा, सुनिल कोठारी, सौ. ज्योती दर्डा, सौ. स्मिता दर्डा, सौ. सुरेखा कोठारी, पूर्वा कोठारी, चि. जेविक कोठारी, सतीश लोढा, डॉ. वसंत कटारीया, माणकचंद कटारीया, डॉ. आशिष भंडारी, डॉ. आदित्य दमाणी आदी उपस्थित होते.

अजित बोथरा म्हणाले की, रुग्णांना चांगली सेवा देऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलने आदर्श काम केले. सामाजिक भान ठेवून हॉस्पिटल रुग्णांना सेवा दिली जात आहे. डॉक्टर, कर्मचारी हा तन्मयतेने रूग्णांची काळजी घेतात, रुग्णांना दिलासा देण्याचे काम करत असल्याचे सांगितले.

यावेळी ज्योती दर्डा म्हणाल्या की, रूग्णसेवा हा एक यज्ञ असून तो सातत्याने चालविणे अवघड काम आहे. हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचे काम जैन सोशल फेडरेशनचे सर्व पदाधिकारी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने करत आहे. हे गौरवास्पद बाब आहे. समाजातील प्रत्येक घटकाला योग्य ती सेवा दिली जात आहे. जे कार्य केले जाते पूर्ण श्रध्देने व निष्ठेने केले जात आहे. या कार्यात आम्हासही सहभागी करुन घेत असल्याने सुख–समाधान–शांती लाभत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, बोथरा परिवाराने हॉस्पिटलच्या सेवाकार्यास नेहमीच हातभार लावला आहे. आचार्यश्रींवरील श्रध्देतून अनेक दानशूर या मोठ्या कार्यात योगदान देतात. शिबीराच्या माध्यमातून तुमच्या शाबासकीमुळे एक प्रेरणा मिळते आणि नव्या उमेदीने शिबीरे घेण्यास मदत होते. हे सामाजिक कार्य अजून जोमाने करण्याचा मानस आहे. साामजिक बांधिलकीच्या माध्यमातून अत्याधुनिक मशिनरी व तज्ञ डॉक्टरांमार्फत कमी दरात रुग्णांना सेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न हॉस्पिटलच्यावतीने सुरु असल्याचे सांगितले. या विभागासाठीही कायम अनेक दानशूरांनी सहकार्य केले आहे.

सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लानी यांनी आभार मानले. या शिबीरात सुमारे ७७ रूग्णांची तपासणी करण्यात आली.



के.जी. कला महाविद्यालयात रॅगिंग प्रतिबंधात्मक दिन व राष्ट्रीय ग्रंथालय दिन साजरा करण्यात आला.

# रॅगिंग प्रतिबंधात्मक व राष्ट्रीय ग्रंथालय दिन ‘के.जी. कला महाविद्यालया’मध्ये साजरा

नगर – के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात रॅगिंग प्रतिबंधात्मक दिन व राष्ट्रीय ग्रंथालय दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयात रॅगिंग विषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने ’ब्लॉग लेखन स्पर्धा’ घेण्यात आली. तर ग्रंथालय दिनानिमित्त महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त किशोर मुनोत यांनी विद्यार्थ्यांना रॅगिंग हा केवळ गुन्हा नसून मानवी मूल्यांचा अपमान आहे. महाविद्यालय हे ज्ञान, संस्कार, सहकार्याचे केंद्र असावे असे सांगून ग्रंथालय दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व विशद केले.

महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा.डॉ.स्वाती मुनोत यांनी रॅगिंग विरोधी दिन म्हणजे केवळ कायद्याची अंमलबजावणी नव्हे मानवी नातेसंबंधातील सकारात्मक बदलाची सुरुवात आहे तर ग्रंथालय दिनानिमित्त पुस्तक ही आपल्या जीवनाची दिशा बदलू शकतात जीवन अधिक सुंदर करू शकतात. असे प्रतिपादन केले.

ग्रंथपाल सौ. हर्षाली रासकर यांनी ग्रंथालय दिनाविषयी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. चव्हाण सविता यांनी केले. प्रा. स्नेहल बोरावके यांनी आभार मानले.

याप्रसंगी प्रा.डॉ.वर्षा कीर्तने प्रा.डॉ. प्रशांत खोपटीकर, प्रा.आरती खेडकर व विद्यार्थी उपस्थित होते.



अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीची निकिता शिंदे हिचा फार्मोत्सवात सन्मान करण्यात आला.

# अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीची निकिता शिंदे हिचा राष्ट्रीय सन्मान

नगर – नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन, पुणे व सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या संयुक्त विद्यमाने मॅन्युफॅक्चरिंग स्पर्धा २३ व्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत २ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली. यामध्ये अरीहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर येथील द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी निकिता शिंदे हिने ७७.४६% गुण मिळवून अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये प्रथम क्रमांक मिळवला.

तिला या उल्लेखनीय यशाबद्दल सन्मानचिन्ह (चषक) देऊन गौरविण्यात आले.

तिला हा सन्मान श्रीजय पाटील (सदस्य, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, दिल्ली) व डॉ. डी. बी. जाधव (संचालक, इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी सांगितले की, या यशात महाविद्यालयाच्या सर्व शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे. प्रा. माधुरी पवार, प्रा. प्रतीक्षा गांधी, प्रा.वृषाली गायकवाड, प्रा. शितल खंडागळे यांचे मार्गदर्शन लाभले व सर्व सहकाऱ्यांनी निकिता शिंदे हिचे अभिनंदन केले.

# जगाला विश्वशांतीचा संदेश देणारे पसायदान संत ज्ञानेश्वरांनी सांगितले

## दत्तात्रय वारकड यांचे प्रतिपादन; सारडा महाविद्यालयात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांचे जीवन कार्यावर व्याख्यान



हिंदसेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त संत ज्ञानेश्वर माऊलींचे जीवन कार्य या विषयावर वक्ते दत्तात्रय वारकड यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – महाराष्ट्र हे संतांची भूमी आहे या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांनी संत ज्ञानेश्वरी हा पवित्र ग्रंथ नेवासा या नगरीमध्ये लिहिला आहे. हे आपले अहिल्यानगर वासियांचे अहो भाग्यमच आहे. भागवत धर्माचा आचरण अंगीकार करून कोणीही ईश्वर प्राप्त करून घेऊ शकतो. हे बीज माऊलींनी जनसामान्यांमध्ये रोवले. ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस असे म्हटले जाते. ज्ञानेश्वरी ग्रंथाचे मुख्य प्रेरणा स्त्रोत हे त्यांचे बंधू विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ यांना मानले जाते. श्री भगवत गीतेचे ७०० श्लोक व १८ अध्याय आहेत या ७०० श्लोकावर संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांनी ९००० ओव्या लिहिल्या व प्रत्येक ओवी विश्लेषित केले. ज्ञानेश्वर माऊली यांनी ज्ञानेश्वरी मध्ये कर्मयोग भक्तीयोग व ज्ञान योगाचे महत्त्व विशद केले आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञान आणि भक्तीचे प्रतीक बनले आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथामुळे भारतीय संस्कृती आणि संतवाडमयाकडे अखिल विश्वाचे लक्ष वेधले गेले. संत ज्ञानेश्वर माऊली यांनी वयाच्या २१व्या वर्षी इसवी सन १२९६ मध्ये इंद्रायणी काठी देवाची आळंदी येथे संजीवन समाधी घेतली. संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या समाधीला ७५० वर्ष आज पूर्ण होत आहेत या सप्तशत्कोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष जयंती दिन वर्ष साजरे केले जात आहे. संत ज्ञानेश्वर यांनी ९००० ओव्या असलेला ज्ञानेश्वरी ग्रंथ यावर सार ग्रहण करून अवघ्या नऊ ओव्यांचे पसायदान प्रसाद रुपी दान आपले विश्वगुरू थोरले बंधू संत श्री निवृत्तीनाथ महाराज यांना पसायदान मागितले आहे. या पसायदानामध्ये विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना ते आपल्या सद्गुरुकडे करतात. पसायदान ही निर्मिती संत ज्ञानेश्वर माऊलींचे हे विश्व कल्याणाची प्रार्थना म्हणजे संत ज्ञानेश्वराच्या वैश्विक सद्भावनेचा व प्रतिभेचा परमोच्च साक्षात्कार होय.जगाला विश्वशांतीचा संदेश देणारे पसायदान संत ज्ञानेश्वरांनी सांगितले, असे प्रतिपादन लेखक दत्तात्रय वारकड यांनी केले आहे.

हिंदसेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त संत ज्ञानेश्वर माऊलींचे जीवन कार्य या विषयावर वक्ते दत्तात्रय वारकड यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी हिंदसेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयाचे प्राचार्या माहेश्वरी गावित, प्रा.डॉ.प्रतिक्षा गायकवाड, प्रा.डी.संगीता शेळके, प्रा.डॉ.दया जेठे, डी.प्रकाश जाधव, प्रा. अर्चना क्षीरसागर आदी उपस्थित होते.

प्रास्तविकात प्राचार्य माहेश्वरी गावित म्हणाल्या, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी अहिल्यानगर मधील नेवासा या गावी ज्ञानेश्वरी चे लेखन केले आहे. या पैस खांबाचे मंदिर अहिल्यानगर मध्ये असल्याचा अभिमान आहे. समाजातील अमुलाग्र बदलासाठी संतांचे मोठे योगदान आहे. समाजातील भेदभाव दूर करण्याचे कार्य संतांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. प्रतिक्षा गायकवाड यांनी केले. प्रा.डॉ. दया जेठे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी कु.रेणुका निसळ यांनी पसायदानाचे गायन केले. या कार्यक्रमाला सारडा महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

१५ ऑगस्ट पासून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे ७५० वी जयंती वर्ष साजरे होत आहे. त्यानिमित्ताने १४ ऑगस्ट पासून महाराष्ट्र शासनाने सर्व शाळा व महाविद्यालयातून जगाला विश्वशांतीचा संदेश देणारे पसायदान हे अनिवार्य केले आहे. त्याची सुरुवात म्हणून सारडा महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य माहेश्वरी गावित यांनी दिली आहे.

## रयत शिक्षण संस्थेचे सरस्वती विद्यालय

विसापूर, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर.

### टेंडर नोटीस

**लेबर कॉन्ट्रॅक्टर व मटेरियल सप्लायर नेमणेबाबत.**

आमच्या विद्यालयाच्या मुख्याध्यापक ऑफिसचे फर्निचरचे काम करणे. (कलर व लाईट फिटींग वगळून) सर्व फर्निचरचे काम करणे यासाठी रेट बंद लिफाफ्यामध्ये सरस्वती विद्यालय, विसापूर, ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथे देण्यात यावेत. सदर कामाचे कोरे टेंडर फॉर्म विद्यालय कार्यालयात किंवा ओम साई कन्सल्टंट, १/२,गोवर्धन अपार्टमेंट आंबेडकर रोड अहिल्यानगर यांचे कार्यालयात दि. १३/०८/२०२५ ते दि.२०/०८/२०२५ पर्यंत रु. ५००/– भरुन मिळतील व भरलेले टेंडर फॉर्म दि. २१/०८/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सरस्वती विद्यालय, विसापूर, ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर यांच्या ऑफिसमध्ये स्विकारण्यात येतील. टेंडर जमा करताना त्यासोबत रु. ३०००/– बयाना रक्कम भरावी लागेल. वरील काम पुर्ण करण्याचा कालावधी हा १ महिने राहिल.

१) फर्निचर कामासाठी लागणारे सर्व मटेरियल उदा. प्लायवूड, फोरमायका, फेव्हीकॉल,बिजागऱ्या, लाकुड, खिळे इत्यादी संस्थेकडून पुरविले जाईल.
२) फर्निचर कामासाठी लागणारे मटेरियल : प्लायवूड, फोरमायका,फेव्हीकॉल, बिजागऱ्या, लाकुड, खिळे इत्यादीचे रेट बंद पाकीटामध्ये द्यावेत.
३) कोणतेही टेडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे याबाबत सर्व अधिकार सरस्वती विद्यालय, विसापूर, ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर यांनी राखुन ठेवले आहेत.

प्राचार्य
**सरस्वती विद्यालय व ज्युनि.कॉलेज ऑफ सायन्स**
विसापूर, ता.श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर, मो : ९८९०३०२४१३

## जाहीर नोटीस

प्रति.
**श्री.सलीमखान नवाबखान पठाण**
रा.मुकुंदनगर, अहिल्यानगर
ता.जि अहिल्यानगर. : अर्जदार
विरुध्द
अधिकारी.जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका.
अहिल्यानगर : सामनेवाले

ज्याअर्थी. अर्जदार यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३(३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्री.सलीमखान नबाबखान पठाण** यांचा स्वतःचा जन्म दि. २६/१२/१९६० रोजी जन्म झालेला आहे. त्यांचे जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, अर्जदार श्री. सलीमखान नबाबखान पठाण यांचा स्वतःचा जन्म दि.२६/१२/१९६० रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे श्री.सलीमखान नबाबखान पठाण यांचा स्वतःचा जन्म दि.२६/१२/१९६० रोजी जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दि. २९/०७/२०२५ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलल्या मिळकती या मिळकतींचे विद्यमान मालक **१. मोहसीन अहमद कासीम शेख, २. समीना बानू अयाज खान, ३. निलोफर अब्दुल वाहिद शेख, ४. मुबीना अब्दुल वहाब खान, ५. तहसीन राजमोहम्मद शेख, ६. शमीम सिराज शेख, ७.कामरान सिराज शेख, ८. इम्रान सिराज शेख, ९. तबस्सुम नाझ W/O मोहम्मद अब्दुल नाझर, १०. अंजुम सादिक बेग, ११. तरन्नुम फिरोज शेख, १२. हलीमा निसार शेख, १३. राजमोहम्मद निसार शेख, १४.झुबेर निसार शेख, १५. रिजवाना शोएबुद्दीन पटेल, १६.शबनम युसुफ शेख, १७. अफरीन मतीन शेख, १८. खलील इब्राहीम शेख, १९. तन्वीर शब्बीर मिर्झा बेग, २०. जुनेद फिरोज खान, २१. परवेज फिरोज खान, २२. फरहात तन्वीर मिर्झा बेग, २३. मतीन कासिम शेख, सर्व रा. गोवर्धन अपार्टमेंट समोर, आंबेडकर रोड, माळीवाडा, अहमदनगर.** यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकती असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहेत. सदर मिळकतींचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतींचे विक्रीबाबत बोलणी होऊन मिळकतींचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांकडून विसारादाखल रक्कम स्वीकारुन सदर मिळकती आमचे अशिलांस खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतींच्या खरेदीखताचा व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकतींवर इतर कोणाचाही बोजा नसून सदर मिळकती या निर्वेध, निजोखमी, व बिनबोजाच्या असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही बोजा, मालकी हक्क हितसबंध अगर कब्जा नाही, अशी मिळकतींचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलास खात्री दिली असून भरोसा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क, कुळ वहिवाट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकी हक्क हितसबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसांचे आत** लेखी स्वरुपात कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकती या निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील,नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट** : डिस्ट्रीक्ट अहमदनगर, सब डिस्ट्रीक्ट ता. नगर पैकी, येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **टि.पी.स्कीम नं. ३ मधील खालील वर्णनाच्या प्लॉट मिळकती** –

| फा. प्लॉट नं. | क्षेत्रफळ | यांसी चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| २१०/१४ | २१२.१३ | फा.प्लॉट नं.२११ | फा.प्लॉट नं.२१०/१३ | ९ मी.रुंदीचा रस्ता | फा.प्लॉट नं.२१०/१५ |
| २१०/१५ | ९०.९३ | फा.प्लॉट नं.२११ | फा.प्लॉट नं.२१०/१४ | ९ मी.रुंदीचा रस्ता | फा.प्लॉट नं.२१०/१६ |
| २१०/१६ | ८९.०० | फा.प्लॉट नं.२११ | फा.प्लॉट नं.२१०/१५ | ९ मी.रुंदीचा रस्ता | फा.प्लॉट नं.२१०/१७ |
| २१०/१७ | ८७.०८ | फा.प्लॉट नं.२११ | फा.प्लॉट नं.२१०/१६ | ९ मी.रुंदीचा रस्ता | फा.प्लॉट नं.२१०/१८ |
| २१०/१८ | ८५.१३ | फा.प्लॉट नं.२११ | फा.प्लॉट नं.२१०/१७ | ९ मी.रुंदीचा रस्ता | फा.प्लॉट नं.२१०/१९ |

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक खुल्या प्लॉट मिळकती त्यामधील, तदंगभुत वस्तुसह, वागवहिवाटीचे हक्कांसह काही एक राखुन न ठेविता.

**अ‍ॅड. फिरोदिया आनंद आर**
ऑफिस – ११९, अंबर प्लाझा ए बिल्डीग
एस.टी. स्टॅण्ड जवळ, अहमदनगर
मो : ९८९०६१५२५३

अहमदनगर
ता. १३/०८/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील **टि पी स्कीम नं ३ मधील फायनल प्लॉट ८० यांचे एकुण क्षेत्रफळ ३८१९.०० चौ.मी यापैकी २०२.०० चौ.मी यांची लांबी पुर्व –पश्चिम ७५ फुट व दक्षिण –उत्तर २९ फुट आहे. याचा जुना सर्व्हे नं. ४७/७अ/१ असा आहे सदरची मिळकत ही विद्यमान मालक सुदाम हरीभाऊ भोसले,जयश्री सुदाम भोसले व शितल सुदाम भोसले यांनी श्री माधव सयाजी चव्हाण यांचे कडुन कायमखुष खरेदीने घेतलेली आहे.** सदर मिळकत ही घर मिळकत आहे. यांसी चतुःसिमा **पुर्वेस : जुना सर्व्हे नं ४७/१ अ/१ पैकी,दक्षिणेस रस्ता, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : जुना सर्व्हे नं ४७/७ अ/१ पैकी** नमूद केलेल्या मिळकतीबद्दल विद्यमान मालक विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरविलेला आहे. सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक ,वित्तीय संस्था अगर सोसायटीचा कर्ज बोजा नाही जामिन तारण नाही तसेच सदर मिळकतीबाबत भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. दि.१३/०८/२०२५

**अ‍ॅड.उषा जगदाळे**
पत्ता : हऊ श्री बंगलो,आदर्श कॉलनी,एचडीएफसी बँक जवळ,
प्रोफेसर चौक, सावेडी, अहमदनगर, मो : 8888888199

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **श्री. बालु उर्फ बाळासाहेब गंगाराम डहाळे, रा. गोंधळे गल्ली, बारातोटी कारंजा, वार्ड नं. ४६, घर नं. ५०४४, माळीवाडा, अहिल्यानगर** यांचे मालकीची व ताबे वहिवाटीची अशी मिळकत आहे. सदर मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिलांची विद्यमान मालकासोबत बोलणी चालू आहे व त्याप्रमाणे विद्यमान मालकांनी आमचे अशिलापासून विसारा दाखल रक्कमही स्वीकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खात्री मिळकतीचे विद्यमान मालकानी आमच्या अशिलास दिलेली आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत,गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बॅक बोजा सोसायटी राईटस अन्न वस्त्र, लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट** : **मिळकतीचे वर्णन** : जिल्हा तुकडी अहमदनगर पो.तु.ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **शहरनगर** येथील माळीवाडा भागातील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| सिटी सर्व्हे नंबर | चौ.मी. |
|---|---|
| ४०१८/१ | ३६.८० |

ही संपूर्ण जागा व त्यावरील ४७ वर्षे जुने मोडकळीस आलेले बांधकाम क्षेत्र ४५.१७ चौ.मी. मिळकतीबाबत.

**यांसी चतुःसिमा** –
पुर्वेस – राजु रोकडे यांची जागा दक्षिणेस – राऊत यांची जागा
पश्चिमेस – नागापुरे यांची जागा उत्तरेस – रस्ता
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत काही एक राखुन न ठेविता.

**अ‍ॅड.संजय बबनराव गायकवाड**
पत्ता : अपूर्वा कॉम्प्लेक्स, जामखेड रोड, अहमदनगर
मो : 9421333302

दि.१३/०८/२०२५
अहमदनगर.

## जाहीर नोटीस

प्रति.
**सुरय्याँ ईब्राहीम शेख**
रा.मुकुंदनगर, अहिल्यानगर
ता.जि अहिल्यानगर. : अर्जदार
विरुध्द
अधिकारी.जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका.
अहिल्यानगर : सामनेवाले

ज्याअर्थी. अर्जदार यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३(३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार सुरय्याँ ईब्राहीम शेख** दि. ०१/०६/१९६५ रोजी जन्म झालेला आहे. त्यांचे जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसा जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, अर्जदार सुरय्याँ ईब्राहीम शेख यांचा जन्म दि.०१/०६/१९६५ रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे सुरय्याँ ईब्राहीम शेख यांचा स्वतःचा जन्म दि.०१/०६/१९६५ रोजी जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील.तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दि. ३०/०७/२०२५ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत हि **मे. मॉडर्न रेफ्रीजरेशन अ‍ॅण्ड इंजिनिअरींग वर्क्स** या भागीदारी संस्थेची मालकी **हक्क** वाहिवाटीची होती व आहे. सदरच्या भागीदारी संस्थेमध्ये त्रिविक्रम भगवंत खिस्ती, अच्युत भगवंत खिस्ती व प्रभाकर भगवंत खिस्ती असे तीन भागीदार होते. दिनांक ०२/०४/२००३ रोजी अच्युत भगवंत खिस्ती हे सदरच्या भागीदारी संस्थेमधून निवृत्त झाले व त्रिविक्रम भगवंत खिस्ती व प्रभाकर भगवंत खिस्ती हे दोघेच भागीदार म्हणून राहिलेले होते. दरम्यानचे काळात प्रभाकर भगवंत खिस्ती हे दिनांक २२/०६/२००९ रोजी मयत झाले व त्यानंतर त्रिभुवन भगवंत खिस्ती यांनी सदरच्या भागीदारी संस्थेची स्थावर व जंगम मालमत्ता एकट्याने हडप करण्याच्या गैरउद्देशाने प्रभाकर भगवंत खिस्ती यांचे वारसांविरुद्ध फक्त सदरची भागीदारी संस्था विसर्जित करून मिळणेसाठी कोर्टामध्ये दावा दाखल करून व त्याची कोणतीही नोटीस कायद्याप्रमाणे प्रभाकर भगवंत खिस्ती यांच्या वारसांना न लावता त्यांच्याविरुद्ध एकतर्फी आदेश घेतला. सदरचा दावा पुन्हा चालविणेकरीता आमचे आशिलांनी कोर्टामध्ये योग्य ती कारवाई चालू केलेली आहे व सध्या ती प्रलंबित आहे. सदर भागीदारी संस्था विसर्जित झालेली आहे असे भासवुन व खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे त्रिभुवन भगवंत खिस्ती हे एकमेव मालक असल्याचे भासवून ते सदरची मिळकत तिऱ्हाईत इसमांस विक्री करणार असलेबाबतची खात्रीशीर माहिती आमचे आशिलांस मिळालेली आहे. तरी सर्वांना या जाहीर नोटीसीअन्वये कळविण्यात येते की, आपण खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीबाबत त्रिभुवन भगवंत खिस्ती यांच्याशी कोणत्याही प्रकारचा खरेदी–विक्रीचा, करारनाम्याचा, भाडेपट्ट्याचा व्यवहार करू नये. सदरच्या मिळकतीमध्ये आमच्या आशिलांचा कायदेशीर हक्क व आधिकार आहे. याउपरही कोणीही त्यांच्याशी काही व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमच्या आशिलांच्या सदर मिळकतीमध्ये असलेल्या कायदेशीर हिश्श्यावर बंधनकारक राहणार नाही व तिऱ्हाईत इसमांस सदर मिळकतीचा संपूर्ण कायदेशीर हक्क, अधिकार व कब्जा मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची नोटीस दिली असे.दि.१३/०८/२०२५

**मिळकतीचे परिशिष्ट** : **मिळकतीचे वर्णन** – डी सब डी ता. नगर पैकी मौजे **नागापुर** येथील **एमआयडीसी** हद्दीतील मिळकत खालील वर्णनाची –

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| डी–११ | ४०५० | प्लॉट नं.डी–३ | प्लॉट नं.डी–१० | एमआयडीसी रोड | प्लॉट नं.डी–१२ |

तसेच सदर मिळकतीवर असलेले संपूर्ण बांधकाम व मशिनरी यासहीत

ऑफिस :
वांबोरी, राहुरी,
अहमदनगर (अहिल्यानगर)

**अ‍ॅड.किरण पिराजी पागिरे**
बी.ए.एलएल,एम, मो : 7350075950

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये कार्यवाही पूर्व अतिम नोटीस

### लाड सुवर्णकार सेंट्रल को–ऑप.क्रेडीट सोसा.लि.,रामचंद्र खुंट, अहिल्यानगर

या संस्थेने कर्जदारांच्या थकबाकीपोटी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १०१ अन्वये कार्यवाही करण्याचे अनुशंगाने दि.०३/०७/२०२५ अन्वये कार्यवाही पूर्व नोटिसा रजिस्टर पोस्टाद्वारे खालीलप्रमाणे नमूद कर्जदार व जामिनदार यांना बजावल्या होत्या. मात्र सदर नोटीस पोस्टाचे शेऱ्यासह परत आलेल्या असल्याने नोटीस पाठविलेची पोहोच संस्थेस प्राप्त झालेली नसल्याने त्यांना जाहीर सुनावणी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

१) **कर्जदार–भवाळ भारती सुरेश**
**पत्ता–म्युन्सिपल कॉलनी, घोरपडे हॉस्पिटलजवळ, नालेगांव, दिल्लीगेट, अहिल्यानगर.**
२) **जामिनदार–शिंदे धिरज किरण**
**पत्ता–विश्वयनराजे नगर, नेप्ती रोड, केडगांव, अहिल्यानगर.**
३) **जामिनदार–आल्हाट राहुल जगन्नाथ**
**पत्ता–प्लाट नं.२१/२२, समर्थ नगर, केडगांव,अहिल्यानगर.**

आपणांस या नोटीसद्वारे कळविणेत येते कि, आपणापैकी वरील क्र.१ हे कर्जदार असून त्यांनी दि.०३/०४/२०२५ रोजी संस्थेकडून रु.१,५०,०००/– रकमेचे कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जास आपण क्र.२ व ३ जामिनदार आहात. आपणापैकी वरील कर्जदार क्र.१ यांचेकडे संस्थेची दि.०३/०७/२०२५ अखेर रु.१,५७,९७९/– एवढी रक्कम येणे बाकी (थकबाकी) आहे. सदर कर्ज रकमेची परतफेड/कर्ज रकमेचे भरणा हप्ते आपण वारंवार तोंडी/लेखी मागणी करुनही अद्यापही भरणा केलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १०१ अन्वये सक्तीची कर्ज वसुली करण्यासाठी आता आपण कर्जदार व जामिनदार पात्र आहात. तुम्ही कर्जाची परतफेड करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार न केल्याने तुमचेकडील कर्जाची संपूर्ण बाकी वसूल करणेसाठी त्वरित महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १०१ अन्वये दावा दाखल करावा, असा निर्णय संस्थेने घेतला आहे. तेव्हा या जाहीर नोटिसीद्वारे आपणांस कळविणेत येते कि, सदर नोटीस मिळताच आपण आठ दिवसांत संपूर्ण कर्ज/थकीत कर्ज रक्कम व्याज मुद्दलासह त्वरीत व तात्काळ संस्थेत भरणा करावी, अन्यथा सक्तीची कर्ज वसुलीची कायदेशीर वसुली कारवाईसाठी होणाऱ्या परिणामास व खर्चास आपण सर्वस्वी जबाबदार असाल, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**सचिव**
**लाड सुवर्णकार सेंट्रल को–ऑप. क्रेडीट सोसा.लि., अहिल्यानगर**

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# कॅलिडोस्कोप



## ...आणि इंटरनेटचं व्यसन सुटलं

सध्याच्या इंटरनेटच्या जगात लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकालाच स्मार्टफोनचं व्यसन लागलं आहे. बरीच मुलं स्मार्टफोन हातात घेऊन तासनतास गेम खेळत बसतात. सोशल मीडियावर पडिक असतात. ही मुलं मैदानी खेळ खेळत नाहीत, वाचत नाहीत, अभ्यासातही मागे पडतात. मग अशा मुलांना या व्यसनातून बाहेर काढण्यासाठी पालक निरनिराळ्या कल्पना लढवतात. कॅनडामधल्या कॅलगरीमध्ये राहणाऱ्या जेमी क्लार्क यांनीही आपल्या मुलाचं स्मार्टफोनचं व्यसन सोडवण्यासाठी अजब युक्ती लढवली. त्यांचा १८ वर्षांचा मुलगा खोबे सतत फोनमध्ये डोकं खुपसून बसायचा. मग जेमी यांनी त्याला मंगोलियातल्या दुर्गम परिसरात नेलं. तिथे इंटरनेटच काय, वाहतुकीचीही सोय नव्हती. मंगोलिया कॅनडापासून आठ हजार किलोमीटर लांब आहे. जेमी यांनी मुलासोबत २२०० किलोमीटर अंतर कापलं. या काळात जेमी खोबेला वेगवेगळ्या ठिकाणी घेऊन गेले. त्यांनी बाईकवरून प्रवास केला, घोड्यावरून फिरले. डोंगराळ भागात तंबूमध्ये राहिले. खोबेला हे वातावरण खूप आवडलं. या प्रवासादरम्यान त्याला मोबाईल वापरता आला नाही. यामुळे खोबेचं मोबाईलचं व्यसन कमी झालं. इंटरनेट वापरलं नाही तर त्याची खूप चिडचिड होत असे. पण या प्रवासामुळे त्याची ही सवय सुटली. आता तो आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवतो. भरपूर गप्पा मारतो, वाचन करतो. हे जग इंटरनेटपेक्षाही खूप सुंदर आहे याची जाणीव खोबेला झाली.

## वाहतुकीचे नियम सांगण्यासाठी गाण्यांचा आधार

शहरांमध्ये वाहतूक व्यवस्था सांभाळणारे अनेक वाहतूक पोलिस लोकांना नियम मोडले, तर सौम्यपणे समजावून सांगतात, तर काही जण कडकपणे वागतात; परंतु एका वाहतूक पोलिसाची शैली वेगळी आहे. गर्दीच्या चौकात गाणे गाऊन हा पोलिस लोकांना वाहतुकीचे नियम समजावून सांगत आहे.

हेल्मेट, सीट बेल्ट आणि वाहतूक नियमांबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी तो एक गाणे गातो आहे. त्याचा आवाज, शैली आणि संदेश देण्याची पद्धत इतकी प्रभावी आहे, की लोक तिथेच थांबून त्याचे ऐकतात. या पोलिसाच्या शैलीचे अनेक लोक कौतुक करत आहेत. रस्त्यांवर चालण्यासाठी वाहतुकीचे नियम बनवले गेले आहेत. वाहतूक पोलिसांचे कर्मचारी त्यांना त्यांचे पालन करायला लावण्यासाठी तैनात असतात. कधीकधी हे वाहतूक पोलिस कर्मचारी लोकांना बोलून समजावून सांगतात, तर कधीकधी त्यांना चालान देऊन धडा शिकवतात; पण आजकाल एका वाहतूक पोलिसाचे



गाण्यात समजावून सांगणे समाज माध्यमावर चांगलेच व्हायरल झाले आहे. वाहतूक पोलिस गाणे गाऊन लोकांना वाहतूक नियम सांगत आहे. त्यात गाण्याचे सूर 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे', 'मेहंदी लगा के रखना' या प्रसिद्ध गाण्यावरून घेतले आहेत. पोलिस कर्मचारी 'फोटो तुम्हारी लेंगे', चलन कटा देंगे असे गाताना दिसत आहे. त्यावर अनेक लोक प्रतिक्रियाही देत आहेत.



## इथल्या महिला आहेत चिरतरुण

वय वाढल्याच्या खुणा चेहऱ्यावर दिसू लागतात. तारुण्य सरल्यानंतर चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. म्हणूनच महिला आणि पुरुष तरुण दिसण्यासाठी खूप प्रयत्न करतात. महिला ब्युटी पार्लरमध्ये जातात. कॉस्मेटिक सर्जरी करून घेतली जाते. पुरुषही वेगवेगळे उपचार करून घेतात. मात्र तैवानमधल्या महिलांचं सौंदर्य टिकून राहतं. या महिला चिरतरुण दिसतात. इथल्या महिलांचं वय वाढलं तरी त्या तरुणच दिसतात. तैवान हे एक बेट आहे. तैवान हा चीनचा एक भाग आहे. एक देश म्हणून तैवानचे जगातल्या १७ देशांशी संबंध आहेत. इथल्या महिला खूप सुंदर असतात आणि बराच काळपर्यंत तरुण दिसतात. मात्र या सौंदर्याचं रहस्य त्यांचा आहार किंवा मेक अप नाही तर वेगळ्याच कारणामुळे त्या चिरतरुण राहतात. तैवानमधल्या महिला आपल्या रुपाला खूप जपतात. त्यामुळे या महिला उन्हात बाहेर पडत नाहीत. उन्हात बाहेर पडल्यामुळे आपण काळे होऊ अशी भीती त्यांना वाटते. इथल्या महिला पावसातही भिजत नाहीत. तैवानमधल्या लोकांना खेळायला आवडतं. त्यामुळे ते तंदुरुस्तही असतात. याच कारणामुळे इथल्या महिला चिरतरुण दिसतात.




## इवलेसे देश

आपला देश आकाराने खूप मोठा आहे. या जगात १९५ देश आहेत. काही देशांचा आकार खूप मोठा आहे तर काही देश आकाराने खूपच लहान आहेत. या देशांची नावंही आपल्याला माहीत नसतील. अशाच काही देशांची ओळख कुतुहलजनक आहे. भूमध्य समुद्रात माल्टा नावाचा देश आहे. हा देश सात बेटांचा समूह आहे. या देशाचं क्षेत्रफळ फक्त ३१६ चौरस किलोमीटर आहे. या देशाची लोकसंख्या फक्त साडेचार लाख इतकी आहे. १९६४ मध्ये माल्टा स्वतंत्र झाला. या देशावर बऱ्याच राष्ट्रांनी राज्य केलं. हिंदी महासागरातला मालदीवही जगातल्या काही छोट्या देशांपैकी एक आहे. लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा विचार केला तर मालदीव हा आशिया खंडातला सर्वात लहान देश आहे. २९८ चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या या देशाची लोकसंख्या साडेचार लाखांच्या आसपास आहे. मालदीवला १९६६ मध्ये स्वातंत्र्य मिळालं. इथे पर्यटक मोठ्या संख्येने येतात. कॅरेबियन समुद्रात सेंट किट्स आणि नेविस हे दोन देश आहेत. ही दोन सुंदर अशी बेटं आहेत. त्यांचा शोध ख्रिस्तोफर कोलंबसने लावला होता. सेंट किट्स १६८ चौरस किलोमीटर तर नेविस ९३ किलोमीटर परिसरात पसरला आहे. पॅसिफिक महासागरात मार्शल हा बेटांचा समूह आहे. हा सुद्धा एक देश आहे. इथे १०० पेक्षा अधिक बेटं आहेत. या देशाचं संविधान आणि झेंडाही आहे. अमेरिकन डॉलर हे इथलं चलन आहे.




## विमानतळाच्या रन वे वरून धावते ट्रेन!

जगात अनेक विमानतळ आहेत; परंतु न्यूझीलंडचे गिस्बॉर्न विमानतळ पूर्णपणे वेगळे आणि मनोरंजक आहे. येथे उडणाऱ्या विमानाबरोबरच त्याच ठिकाणाहून जाणारी ट्रेन दिसते. एक रेल्वे लाईन ज्या मार्गावरून जाते, त्याच मार्गावरून विमाने उड्डाण करतात आणि उतरतात.

हे विमानतळ इतके खास आहे, की जर एखादी ट्रेन येत असेल तर विमानाला थांबावे लागते आणि जर विमान उड्डाण करणार असेल तर ट्रेन थांबवली जाते. येथे दोघांनाही एकमेकांना रस्ता द्यावा लागतो. गिसबॉर्न विमानतळ सुमारे १६० हेक्टरमध्ये पसरलेले आहे आणि त्यातून एक रेल्वे लाईन जाते, जी विमानतळाला दोन भागात विभागते. या रेल्वेला गिस्बॉर्न सिटी व्हिंटेज रेल्वे म्हणतात. ही ट्रेन वाफेवर चालते आणि वर्षातून सुमारे १५ वेळा धावपट्टीवरून जाते, विशेषतः उन्हाळ्याच्या हंगामात जेव्हा जास्त लोक येथे भेट देण्यासाठी येतात. या विमानतळावर काम करणारे लोक एकाच वेळी ट्रेन आणि विमान दोन्हींचा वेळ व्यवस्थापित करतात. कोण कधी येईल आणि कोणाला आधी रस्ता द्यायचा याची त्यांना पूर्ण काळजी घ्यावी लागते.

हे विमानतळ लहान दिसू शकते; परंतु दरवर्षी तिथून दीड लाखांहून अधिक लोक प्रवास करतात आणि येथून दर आठवड्याला सुमारे ६० देशांतर्गत उड्डाणे होतात. याशिवाय, येथे एक मुख्य धावपट्टी आणि तीन लहान धावपट्या आहेत. त्यामुळे ते अधिक खास बनते. गिसबोर्न विमानतळ हे असे ठिकाण आहे, जिथे अभियांत्रिकी, शहाणपण आणि वेळेचे योग्य नियोजन एकत्रितपणे काहीतरी खूप वेगळे निर्माण करते. येथे जाताना असे वाटते, की एखाद्या चित्रपटातील एक दृश्य समोर आले आहे, जिथे विमाने उडत आहेत आणि त्याच वेळी ट्रेन ट्रॅकवर धावत आहे.



## स्मशानभूमीमध्ये क्यूआर कोड

स्मशानभूमीचे नाव ऐकताच बहुतेक लोकांच्या मनात शांतता आणि भूतकाळातील आठवणी येतात. पण कल्पना करा, की कबरीवरचा एक छोटासा क्यूआर कोड तुमच्या डोळ्यासमोर एखाद्याच्या संपूर्ण आयुष्याची कहाणी उलगडतो का? केरळमधील एका स्मशानभूमीत असेच काहीसे घडले आहे.

एका स्मशानभूमीतील कबरींना क्यूआर कोड जोडलेले आहेत, जे कोणीही स्कॅन करून मृताची संपूर्ण माहिती जाणून घेऊ शकते. क्यूआर कोड स्कॅन होताच मृताची माहिती मिळते. क्यू आर कोड स्कॅन करताच फोनमध्ये एक वेबसाइट उघडते. या वेबसाइटमध्ये त्या कबरीत पुरलेल्या व्यक्तीची संपूर्ण माहिती आहे. फक्त नाव किंवा वयच नाही, तर त्याची संपूर्ण जीवनकथा. त्याने कोणते काम केले, त्याच्या कुटुंबातील सदस्य कोण आहेत, त्याचे जुने फोटो आणि त्याच्या आठवणी आणि जीवनातील खास क्षण हे सर्व एकाच ठिकाणी दिसतात. त्या वेबसाइटवर 'आठवणी', 'कुटुंब', 'जीवनकथा' आणि 'टाइमलाइन' असे अनेक टॅब आहेत. त्यातून लोक त्या व्यक्तीबद्दल अधिक सखोल जाणून घेऊ शकतात.

सर्वात अनोखी गोष्ट म्हणजे अभ्यागत लॉग, म्हणजेच जे कोणी कबरीजवळ येतात, ते तेथे त्यांचे नाव लिहू शकतात, जेणेकरून श्रद्धांजली वाहण्यासाठी कोण आले हे कळू शकते. तिथे एक ओळ आहे जी प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्श करते, 'ही फक्त एक कबर नाही. ही एक जिवंत कहाणी आहे.' आता लोक 'सोशल मीडिया'वर वेगवेगळी मते देत आहेत. काही जण याला एक उत्तम कल्पना म्हणत आहेत. त्यामुळे प्रियजनांच्या आठवणी नेहमीच जिवंत राहतील, तर काही लोक म्हणत आहेत, की स्मशानभूमीच्या शांततेत तंत्रज्ञानाचा हा खूप हस्तक्षेप आहे.

'सोशल मीडिया' वापरकर्ते वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले... ही एक अतिशय छान प्रणाली आहे, तुम्ही तुमच्या प्रियजनांच्या आठवणी पुन्हा जिवंत करू शकता. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले... या माहितीचा गैरवापरदेखील होऊ शकतो, तर अन्य एका वापरकर्त्याने लिहिले... हे खूप आश्चर्यकारक आहे, एक अतिशय सोपा आणि उत्तम मार्ग आहे.

## अबब... केवढं मोठं हे फुल!

उमललेलं फूल खूप सुंदर दिसतं. शास्त्रज्ञांना जगातलं सर्वात मोठ्या आकाराचं उमललेलं फूल सापडलं आहे. इंडोनेशियातल्या पश्चिम मध्य सुमात्रा बेटांवरच्या जंगलांमध्ये हे फूल सापडलं आहे. हे फूल खूपच अनोखं आणि सुंदर आहे. हे महाकाय फूल बघून शास्त्रज्ञही चाट पडले. हे फूल चार चौरस फूट परिसरात पसरलं आहे. या फुलाला रेफलिसिया



म्हटलं जातं. २०१७ मध्ये याच जंगलात तीन फूट लांबीचं आणि बारा किलो वजनाचं याच जातीचं फूल सापडलं होतं. ते त्यावेळचं सर्वात मोठं उमललेलं फूल होतं. मात्र आता या फुलाचा विक्रम मोडीत निघाला आहे. रेफलिसिया हे परजीवी फूल असून यातून सुगंध नाही तर दुर्गंध येतो. या फुलाची रचना सूर्यफुलासारखी असते. मात्र त्याचा रंग केशरी, आकाशी किंवा पांढरा असतो. हे फूल वर्षातले काही महिने उमलतं. ऑक्टोबरमध्ये हे फूल उमलू लागतं आणि मार्चपर्यंत पूर्णपणे उमलतं. काही काळानंतर हे फूल मरून जातं.

## कर्जफेड न केल्याने कर्जदाराची बायको जप्त!

कर्ज घेताना तारण म्हणून बँकेकडे काही वस्तू तारण ठेवावी लागते. कर्जाची परतफेड करू शकले नाहीत, तर बँक तारण म्हणून ठेवलेली गोष्टच जप्त करते, मग ते घर असू शकते किंवा सोने अथवा कार, दुचाकी वगैरे वगैरे; पण बँकवाल्यांनी एखाद्या जिवंत व्यक्तीवर, तेही एखाद्या महिलेवरच जप्ती आणून तिला सोबत नेल्याचा विचित्र प्रकार झाशीमध्ये घडला असून, बँक अधिकाऱ्यांच्या या गुंडगिरीविरोधात संताप व्यक्त करण्यात आला.

उत्तर प्रदेशातील झाशीमध्ये खासगी बँकेने कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी सर्व मर्यादा ओलांडल्या. कर्जाचा हप्ता न भरल्यामुळे, एका खासगी मायक्रो फायनान्स बँकेने एका महिलेला पाच तास ओलीस ठेवले. हप्ता दे आणि बायकोला ने, असे तिच्या पतीला सांगण्यात आले. हे प्रकरण बमहरौली गावातील आझाद नगर परिसरातील एका खासगी गट कर्ज देणाऱ्या बँकेशी संबंधित आहे. पूंछ येथील बाबाई रोड येथील रहिवासी रवींद्र वर्मा यांच्या पत्नी पूजा वर्मा यांना जबरदस्तीने बँकेत बसवण्यात आलं,असा आरोप आहे. पैसे द्या, तरच तुम्हाला तुमची पत्नी मिळेल असे उत्तर त्या महिलेच्या पतीला देण्यात आले. ते ऐकून तो हबकला.

रवींद्रने तिथे खूप विनवणी केली; पण बँक कर्मचाऱ्यांनी जराही दया दाखवली नाही. शेवटी, हताश होऊन रवींद्रने ११२ नंबरवर फोन केला. पोलिस येताच बँक कर्मचाऱ्यांचे



चेहरे पडले आणि महिलेला घाईघाईने बाहेर काढण्यात आले. आरोपपीडित पूजा वर्मा हिने दिलेल्या अर्जात असे सांगितले, की तिने ४० हजार रुपयांचे कर्ज घेतले आहे. तिने आतापर्यंत ११ हप्ते भरले आहेत; परंतु बँकेच्या नोंदींमध्ये फक्त ८ हप्तेच दिसत आहेत. बँक एजंट कौशल आणि धर्मेंद्र यांनी तिचे तीन हप्ते हडप केल्याचा आरोप आहे.

मध्य प्रदेशातील टिकमगढ येथील रहिवासी असलेले बँक 'सीओ' संजय यादव तिच्या घरी पोहोचले आणि धमकी देऊन पैशाची मागणी करू लागले,असा आरोप महिलेने केला; मात्र त्या महिलेने नकार दिल्यावर पती-पत्नीला जबरदस्तीने बँकेत आणण्यात आले आणि तिथेच अनेक तास बसवून ठेवण्यात आले, असेही महिलेचे म्हणणे आहे. कानपूर देहात येथील रहिवासी बँक व्यवस्थापक अनुज कुमार यांनी सांगितले, की ती महिला गेल्या ७ महिन्यांपासून हप्ता भरत नव्हती, म्हणून तिला बोलावण्यात आले. एवढेच नव्हे तर ती महिला स्वतःच्या मर्जीने बँकेत बसली होती, असा दावाही त्यांनी केला.

सध्या पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. बँक कर्मचारी, एजंट आणि पीडित व्यक्तीची चौकशी सुरू आहे. कर्ज वसुलीच्या नावाखाली लोकांना ओलीस ठेवण्यासारखे डावपेच आता सामान्य झाले आहेत का? या घटनेने केवळ बँकेच्या कामकाजावरच नव्हे तर कायदा आणि सुव्यवस्थेवरही मोठा प्रश्न उपस्थित केला आहे.

## सडपातळ दिसण्याच्या नादात केले नको ते!

प्रत्येकालाच आपल्या वाढदिवसाला सर्वात सुंदर दिसायचे असते. नवीन कपडे घालून इतरांपेक्षा वेगळे दिसावे, असा प्रयत्न असतो; पण जेव्हा ही इच्छा जास्त होते, तेव्हा ती धोकादायक बनू शकते. चीनमधील एका १६ वर्षीय मुलीने तिच्या वाढदिवसाला सडपातळ दिसण्यासाठी अशी चूक केली की तिचा जीव धोक्यात आला. वजन कमी करण्यासाठी तिने दोन आठवडे फक्त उकडलेल्या भाज्या खाल्ल्या आणि रेचक औषधे घेऊ लागली. परिणामी तिला रुग्णालयात दाखल करावे लागले आणि तिचा जीव वाचवणे कठीण झाले. चीनमधील मेई नावाची १६ वर्षीय मुलगी खूप आनंदी होती. कारण तिचा वाढदिवस जवळ आला होता. त्या दिवशी तिने नवीन ड्रेस घातल्यावर सर्वांनी तिचे कौतुक करावे, अशी तिची इच्छा होती. तिथपर्यंत ठीक होते; पण मेईला वाटले, की ती थोडी जाड आहे. त्याबाबत विचार करून ती कमी खाऊ लागली. तिने दररोज फक्त थोड्या उकडलेल्या भाज्या खाल्ल्या आणि पोट साफ करणारी औषधेदेखील घेतली.

असे करत करत दोन आठवडे गेले. मग अचानक एके दिवशी मेईचे हातपाय थरथर कापू लागले. तिला खूप अशक्त वाटू लागले आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. तिचे कुटुंब घाबरले आणि तिला तातडीने रुग्णालयात घेऊन गेले. डॉक्टरांनी रुग्णालयात तिचे रक्त तपासले, तेव्हा असे आढळून आले, की तिच्या शरीरात पोटॅशियम खूप कमी झाले आहे. पोटॅशियम हे एक खनिज आहे, जे आपले हृदय आणि स्नायू योग्यरित्या कार्य करण्यास मदत करते. जेव्हा ते खूप कमी होते तेव्हा हृदयाचे ठोके थांबू



शकतात किंवा एखाद्या व्यक्तीचा श्वास थांबू शकतो.

डॉक्टरांनी ताबडतोब मेईला आपत्कालीन वॉर्डमध्ये दाखल केले आणि तिच्यावर १२ तास सतत उपचार केले. डॉक्टरांनी सांगितले, की मेईची प्रकृती इतकी बिकट झाली आहे, की तिला कधीही हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. जर थोडा जास्त उशीर झाला असता तर तिचा जीवही जाऊ शकला असता.

# महावितरण कार्यालयाकडून केडगावबाबत देण्यात आलेली काही आश्वासने हवेतच?

## नागरिकांचे कार्यालयावर आंदोलन

नगर – केडगाव उपनगराच्या महावितरण कार्यालय संदर्भातील नागरिकांचे विविध प्रश्न प्रलंबित होते, ते सोडविण्यासाठी माजी सभापती मनोज कोतकर यांनी निवेदन दिले होते. त्यानुसार महावितरण कार्यालयाकडून ३ जुलै रोजी बैठकीचे आयोजन, करून १५ दिवसात लाईट संदर्भातील सर्व प्रश्न मार्गी लावतो. असे आश्वासन दिले होते मात्र महावितरण कार्यालयाकडूनकाहीकामासंदर्भात उपयोजना केल्या नाही. त्यामुळे केडगाव उपनगराच्या प्रश्नाबाबत महावितरण कार्यालयाकडून देण्यात आलेले, काही आश्वासने हवेतच विरले असून, संतप्त नागरिकांनी विभागीय महावितरण कार्यालयावर मोर्चा काढत, तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले. यावेळी अजित कोतकर, सोन्याबापू घेबुंड, सुमित लोंढे, विजय सुंबे, आण्णासाहेब शिंदे, ओंकार कोतकर, अक्षय विरकर, सुहास साळुंखे, बाळु कोतकर, संकेत वाघमारे, पप्पु पाठक, संकेत शिंदे, ऋषी गवळी, योगेश आंबेकर, शुभम गायकवाड, शुभम आंबेकर, शुभम लोंढे, शिवम आरुण, श्रीनाथ टकले, करण ठोंभरे, स्वराज भोसले, अनिकेत लोंढे आदी उपस्थित होते.



केडगाव उपनगराच्या वीज प्रश्नाबाबत महावितरण कार्यालयाकडून देण्यात आलेली काही आश्वासने हवेतच पूर्ण होत नसल्याने नागरिकांनी महावितरण कार्यालयावर आंदोलन केले. (छाया – लहू दळवी)

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव परिसरामध्ये नविन वसाहती मोठ्या प्रमाणात वाढत असुन या ठिकाणी विद्युत व्यवस्था नसल्यामुळे परिसरामध्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणात अंधार पसरतो. त्यामुळे अंधाराचा फायदा घेत या भागामध्ये भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. याकरीता आवश्यक असलेल्या भागांमध्ये नविन विद्युत पोल, तारा, डि.पी.पेट्या बसविणे गरजेचे आहे. तसेच काही परिसरांमध्ये विद्युत वाहक तारांमध्ये झाडांच्या फांद्या अडकलेल्या असल्यामुळे सुसाट वेगाने वारा आल्यानंतर सदरील तारा झाडांच्या फांद्यांना घासतात त्यामुळे वेळोवेळी लाईट ये–जा करते. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे परिसरातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. परिसरातील नागरिकांच्या समस्या प्राधान्याने व तातडीने सोडविण्याबाबत आपणास यापुर्वी पत्र देण्यात आले होते. त्यातील काही भागांमध्ये पेटया बसविलेल्या आहेत त्याचप्रमाणे विद्युत पोल बसविण्याचे काम चालु आहे परंतु अनेक ठिकाणी विद्युत पोल बसविणे, तारा ओढणे, झाडांच्या फांद्या तोडणे त्याचप्रमाणे काही ठिकाणच्या राहिलेल्या पेटया बसविणे आदी. कामे करणे बाकी आहे. ही कामे पाउसाळ्यापूर्वीच होणे गरजेचे होते. तरी देखील पुढील ८ दिवसामध्ये पूर्ण करावे. अशी मागणी यावेळी करण्यात आली.

महावितरण कार्यालयाकडून केडगाव उपनगरामध्ये स्मार्ट मीटर बसवण्यात आल्यामुळे नागरिकांना तीनपट लाईट बिल आकारणी होत आहे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. तुमच्याकडून सांगण्यात आले होते की ज्या नागरिकांना विजेच्या बिलाची जास्त आकारणी झाले असेल ती वीजबिले कमी करून देऊ, परंतु अद्याप पर्यंत कोणाचेही वाढीव आलेले वीज बिल कमी करण्यात आलेले नाही, त्यामुळे स्मार्ट मीटर बसवण्याचे काम तात्काळ थांबवा व बसवलेले स्मार्ट मीटर काढून घेऊन जावेत. मनोज कोतकर यांच्या आंदोलनामुळे तरी वारंवार खंडित होणारी लाईट आता जात नाही. पुढील ८ दिवसांमध्ये केडगाव उपनगराचे लाईटचे प्रश्न त्वरित मार्गी लावावे अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असा इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी महावितरण कार्यालयाकडून आंदोलन करताना सांगितले की, केडगाव उपनगराच्या लाईटच्या प्रश्नासंदर्भात तातडीची बैठक घेऊन कामाचे नियोजन करू व सर्व प्रश्न मार्गी लावू. असे आश्वासन यावेळी दिले.



पोलिसांच्या मुला–मुलींकरिता मोफत स्पर्धा परीक्षा केंद्र व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.

# पोलिसांच्या मुला–मुलींसाठी मोफत स्पर्धा परीक्षा केंद्र व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करावे

### महाराष्ट्र राज्य पोलीस बॉईज असोसिएशनच्या वतीने पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – पोलिसांच्या मुला–मुलींना उच्च शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून यशस्वी होण्यासाठी मोफत स्पर्धा परीक्षा केंद्र व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य पोलीस बॉईज असोसिएशनच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

पोलिस मुख्यालय परिसरातील नव्याने उभारल्या जाणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वसाहतीत हे अद्यावत प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव असोसिएशनने मांडला आहे. या माध्यमातून पोलिसांच्या मुला–मुलींना केवळ पोलीस भरतीपुरतेच मर्यादित न राहता आयपीएस, आयएएससारख्या उच्च पदांपर्यंत मजल मारण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे.

असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, या उपक्रमासाठी जिल्हा पोलीस प्रशासन आणि पोलीस अधीक्षक यांचे पाठबळ कायम राहणार आहे. तसेच, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. याबाबत पुढील काळात मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा करण्यात येणार आहे.

या निवेदनावेळी महाराष्ट्र राज्य पोलीस बॉईज असोसिएशनचे अध्यक्ष नितीन खंडागळे, उपाध्यक्ष मंदार लष्कर, खजिनदार संकेत पवार, सचिव सिद्धांत ससाने, गणेश लष्कर, संदीप शिंदे, विनायक भुतकर आदी उपस्थित होते.

# शाळांना वाढीव अनुदान टप्पा तात्काळ वितरित करा

## अनुदान टप्पा वितरणात विलंबामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष

नगर – राज्यातील अनुदानासाठी पात्र ठरलेल्या व वेतन अनुदानाचा टप्पा घेत असलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांना वाढीव टप्पा तात्काळ वितरित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन माजी शिक्षक आमदार तथा शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षण सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र सिंह व शिक्षण संचालक यांना पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय १४ ऑक्टोंबर २०२४ अन्वये टप्पा अनुदान घेत असलेल्या शासनमान्य खाजगी अंशतः अनुदानित शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा अनुज्ञेय करण्यात आला. अपात्र घोषित केलेल्या शाळा तुकड्यापैकी विहित कालावधीत त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा तुकड्यांना वाढीव टप्पा अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आले. शासन स्तरावर घोषित असलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा २० टक्के अनुदान देय ठरविण्यात आले. डोंगराळ भागातील शाळा अनुदान अनुज्ञेय करण्यात आले. सैनिकी माध्यमिक शाळांच्या अतिरिक्त तुकड्यांना वाढीव २० टक्के अनुदानाचा टप्पा घोषित करण्यात आला.



बाबासाहेब बोडखे

परंतु त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना देय अनुदान टप्पा वाढीव टप्प्यांसह व संबंधित अन्य सर्व शाळांना वाढीव अनुदान टप्पा वितरित करण्यासाठी शासनाकडून आवश्यक ऑक्टोंबर २०२४ च्या अनुपालनासाठी आवश्यक असलेल्या निधी निधी उपलब्ध करून देण्यात आला नव्हता. त्यामुळे संबंधित सर्व शिक्षक कर्मचारी अनुज्ञेय ठरलेल्या अनुदानाच्या देय वाढीव टप्प्यापासून वंचित राहिले. परिणामी शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता. हा उद्रेक विधिमंडळ अधिवेशन काळात आझाद मैदान मुंबई येथे आंदोलनाद्वारे व्यक्त करण्यात आला. आंदोलनातील असंतोषाची तीव्रता विचारात घेऊन मुख्यमंत्री यांनी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा व प्रत्यक्षात ऑगस्ट २०२५ मध्ये टप्पा वाढ वितरीत करण्याची घोषणा केली. त्यानुसार शासन निर्णय १४ मंजूर करण्यात आला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यातील अनुदानासाठी पात्र ठरलेल्या व वेतन अनुदानाचा टप्पा घेत असलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांना वाढीव टप्पा ऑगस्ट २०२५ मध्ये त्वरीत वितरित करण्याची मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

अनुदानासाठी पात्र ठरलेल्या व वेतन अनुदानाचा टप्पा घेत असलेल्या अनेक प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील सर्व कर्मचारी हे मागील काही वर्षापासून विनावेतन व काही अत्यल्प वेतनावर काम करत होते. सध्याच्या काळात कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांना वेतनाची नितांत गरज आहे. या सर्व बाबींचा विचार करून राज्यसरकारने आर्थिक तरतूद केल्याचा निर्णय अभिनंदनीय असला, तरी संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन लवकरात लवकर होणे आवश्यक आहे, बाबासाहेब बोडखे यांनी सांगितले.

# स्त्री जन्माचे स्वागत उपक्रमात ५७ विद्यार्थिनींचा सावित्रीची लेक पुरस्काराने गौरव

### कार्यक्रमातून स्त्री शक्तीचा जागर

नगर – स्त्री सन्मान आणि लेकींच्या जन्माचे स्वागत करण्याचा संदेश देणाऱ्या स्त्री जन्माचे स्वागत या सामाजिक उपक्रमांतर्गत शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५७ विद्यार्थिनीचा सावित्रीची लेक पुरस्काराने गौरविण्यात आले.

२०१६ पासून सातत्याने राबविला जाणारा हा उपक्रम शहरात विद्यार्थिनींचा उज्वल भविष्य व सक्षमीकरणाचा आणि लेकींच्या स्वागताचा आदर्श ठरला आहे. गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय विद्यालयात भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी भाजप प्रदेश महिला मोर्चा चिटणीस प्रा. गीता गिल्डा, विजयकुमार शेराल, भाई सथ्था नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनील सुसरे, भाजप शहर जिल्हा सरचिटणीस महेश नामदे आदींसह विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.



स्त्री सन्मान आणि लेकींच्या जन्माचे स्वागत करण्याचा संदेश देणाऱ्या स्त्री जन्माचे स्वागत या सामाजिक उपक्रमांतर्गत शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५७ विद्यार्थिनीचा सावित्रीची लेक पुरस्काराने गौरविण्यात आले.

अनिल मोहिते म्हणाले की, सर्व समाजातील विद्यार्थिनींचा सन्मान होणे हा अभिमानाचा विषय आहे. स्त्री जन्माचे स्वागत हा उपक्रम केवळ विद्यार्थिनींना फक्त प्रोत्साहनासाठी नाही तर निकोप आणि प्रगतिशील देशाचे भविष्य याच विद्यार्थिनींमध्ये आहे एक नवा प्रगतशील समाज घडविण्यासाठी दिशादर्शक असे उपक्रम आवश्यक आहे.

प्रा. सौ गीता स्त्री जीवनावर प्रकाश टाकला व भावनिक असे विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

प्राचार्य सुनील सुसरे यांनी रात्र प्रशाला मध्ये शिकत असलेले विद्यार्थी प्रगती करत आहे. शिक्षण व आजचे युग या विषयावर मार्गदर्शन केले.

विजयकुमार हनुमंत शेराल (संगमनेर) यांनी कवितेतून स्त्री शक्तीचा जागर केला. कल्पनाताई बुलबुले यांनी महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमाची गरज असल्याचे स्पष्ट केले.


उपक्रमाचे अध्यक्ष नरेश कोटा म्हणाले की, समाजात स्त्रियांचा, विद्यार्थिनींचा सन्मान वाढविण्यासाठी आणि लेकींच्या जन्माचे स्वागत करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला. आज या माध्यमातून केवळ सन्मानच नव्हे तर आर्थिक प्रोत्साहनही दिले जात आहे, ज्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढत असल्याचे ते म्हणाले.

या प्रसंगी १० वी आणि १२ वीमध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थिनींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला उपाध्यक्ष वैभव कंदी, सागर महेसुनी, अक्षय कोंडा, विद्याताई एक्कलदेवी, श्रीमती सुनीताताई कंदी, नितीन एकलदेवी, मयूर श्रीगादी, ओंकार श्रीमल, सविता नरेश कोटा, विनायक नागुल, दिगंबर एक्कलदेवी, विशाल कोंडा, संदीप गाजुल, सुरज गाजुल, शुभम कोंडा, आदेश गेंट्याल, वंदनाताई दडगे, राहुल दुलम, तुषार गड्डम आदींसह महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता प्रकाश कोटा यांनी केले. वैभव कंदी यांनी आभार मानले.

# घंटागाडी दररोज न आल्यास नागरिकांना घेऊन महानगरपालिकेच्या आवारात 'कचरा टाकणार'

नगर – गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील प्रभाग क्रमांक ११ मधील नागरिकांना कचऱ्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे. परिसरातील रस्त्यांच्या कडेला व मोकळ्या जागांवर कचऱ्याचे ढीग साचून दुर्गंधी पसरत असून, पावसाळ्यात आजारांचे प्रमाण वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. याबाबत माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी मनपा आरोग्य विभागावर टीका करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



अविनाश घुले

अविनाश घुले यांनी सांगितले की, आरोग्य विभाग नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करत आहे. मनपा सर्व विभागात अव्वल असल्याचा दावा करते, पण प्रभागातील कचऱ्याचा प्रश्न मात्र अजूनही सुटलेला नाही. प्रत्येक वेळी फोन करून कचरा उचलण्यासाठी विनंती करावी लागते, मात्र आरोग्य विभागाकडून केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळतात.

परिसरातील काही भागात १० ते १५ दिवसांपासून घंटागाडी आलेली नाही. काही वेळा गाडी आली तरी तिच्यासोबत केवळ ड्रायव्हर असतो, मदतनीस नसतो. गाडीची उंची जास्त असल्याने महिलांना कचरा टाकताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. मनपा कररूपाने पैसा गोळा करते, पण नागरिकांना मूलभूत सुविधा कधी देणार? असा प्रश्न घुले यांनी उपस्थित केला. मनपाने अजूनही कचरा संकलनासाठी टेंडर प्रक्रियेची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे घंटागाडी वेळेवर व नियमित येत नसल्याचा नागरिकांचा आरोप आहे. येत्या तीन दिवसांत जर प्रभागात घंटागाडी रोजच्या रोज आली नाही, तर नागरिकांना घेऊन मनपा आवारातच कचरा टाकून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा अविनाश घुले यांनी दिला.

स्थानिक नागरिकांनीही घुले यांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवित, लवकरात लवकर कचरा संकलनाची समस्या सोडवण्याची मागणी मनपा प्रशासनाकडे केली आहे. पावसाळ्यातील अस्वच्छतेमुळे रोगराई पसरण्याची शक्यता लक्षात घेता, ही समस्या तातडीने सोडवली जाणे आवश्यक आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा १७ ऑगस्टला मेळावा

नगर – अहिल्यानगर शहरात १७ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मेळावा आयोजित करण्यात आला आहे. नवीन टिळक रोडवरील हॉटेल पॅराडाईज येथे सकाळी ११ वाजता या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. यावेळी माजी मंत्री तसेच महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव घोलप हे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.

चर्मकार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव साळवे हे कार्यकर्त्यांसह राष्ट्रीय चर्मकार महासंघात प्रवेश करणार आहेत. याशिवाय मेळाव्यात चर्मकार समाजातील विविध प्रलंबित प्रश्न, विकासाच्या संधी आणि समाज एकतेबाबत सविस्तर चर्चा होणार आहे.

जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, महिला जिल्हाध्यक्ष लताताई नेटके, संयोजक माणिकराव नवसुपे यांनी समाजबांधव, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मेळाव्यात उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

मेळाव्यासाठी माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, चर्मोद्योग चर्मकार विकास महामंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राज्य अध्यक्ष माधवराव गायकवाड, राज्याचे दुसरे अध्यक्ष शांताराम कारंडे, राज्य उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, महिला आघाडीच्या राज्य कार्यकारिणी सदस्या शोभाताई कानडे, युवक राज्य कार्यकारिणी सदस्य कैलासराव गांगर्डे, चंद्रकांत नेटके, दत्तात्रय गोतीसे, दिलीप कानडे, अनिल कानडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे.

# विपणन व्यवस्थापन क्षेत्रात प्रा. गणेश अंत्रे यांना विद्यावाचस्पती पदवी

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड रूरल डेव्हलपमेंट या संस्थेच्या एमबीए विभागात कार्यरत असणारे प्रा. गणेश अंत्रे यांना विपणन व्यवस्थापन (Marketing Management) या विषयात सखोल अभ्यास व संशोधन करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी बहाल करण्यात आली आहे.

'सोशल मीडियाचा नेटवर्क मार्केटिंग ग्राहकांच्या खरेदी निर्णयावर परिणाम' या विषयावर त्यांनी आपले संशोधन सादर केले. या संशोधन प्रवासात त्यांना त्यांचे गाईड डॉ. संजय धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच त्यांच्या नावावर अनेक संशोधन प्रबंध, पुस्तक आणि पेटंट आहे. तसेच बेस्टो इंटरनॅशनल मुंबई या संस्थेने आंतरराष्ट्रीय ख्यातीचा आदर्श शिक्षक पुरस्कार दिलेला आहे. यावर्षी स्वयंम द्वारे घेण्यात आलेल्या कन्सुमर बिहेविअर या कोर्स मध्ये ते संपूर्ण भारतात प्रथम आले आहे.

प्रा. डॉ. गणेश अंत्रे यांनी आपल्या या यशाचे श्रेय मार्गदर्शक, कुटुंबीय, मित्रपरिवार आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचा विशेषतः उल्लेख करत आभार व्यक्त केले आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य विश्वस्त व सीईओ डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ. पांडुरंग गायकवाड, मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिजित दिवटे, तांत्रिक संचालक सुनील कल्हापुरे यांनी प्रा. डॉ. गणेश अंत्रे यांचे अभिनंदन केले.



विपणन व्यवस्थापन क्षेत्रात प्रा. गणेश अंत्रे यांना विद्यावाचस्पती पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या
स्त्री– पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान
कमजोरी / शुक्राणुंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर–पुणे रोड, अहमदनगर
संपर्क: 94 22 23 90 13 ▪ www.sextreatment.in

# नगरमध्ये वकिलाच्या घरात घुसून कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी

नगर – घराच्या गच्चीवर बेकायदेशीर प्लास्टर करीत वकिल गोरक्षनाथ तांदळे यांच्या परिवाराला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना गावडेमळा येथील कादंबरी फेज ३ येथे १२ ऑगस्ट रोजी दुपारी घडली.

या बाबत ॲड.गोरक्षनाथ तांदळे (वय ४३, रा. कादंबरी फेज ३, गावडे मळा, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादी यांच्या शेजारी राहणारे विवेक प्रभाकर घोडके व सोनिया घोडके यांनी त्यांच्या घरावर अनधिकृत बांधकाम केल्याचा आरोप तांदळे यांनी केला होता. या वादावरुन तांदळे दाम्पत्याने यापूर्वी दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे खटले दाखल केले आहेत. १२ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० च्या सुमारास गोरख तांदळे नावाचा इसम चार–पाच अनोळखी व्यक्तींसह फिर्यादी यांच्या घराच्या टेरेसवर विनापरवानगी चढला. व बेकायदेशीरपणे प्लास्टर करण्याचा प्रयत्न केला व भिंतीचे नुकसान केले.

ही घटना फिर्यादी यांच्या मुलीने त्यांना सांगितल्यावर फिर्यादी स्वतः टेरेसवर गेले असता, गोरख तांदळेने त्यांना अश्लील शिवीगाळ करीत,विवेक घोडके यांच्याकडून तुझी सुपारी घेतली आहे असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली.फिर्यादी यांनी तत्काळ ११२ वर कॉल करुन पोलिसांना पाचारण केले. त्यावेळी त्या सर्वांनी तेथून पलायन केले. पण सायंकाळी ४.३० च्या सुमारास पुन्हा चार–पाच गुंड प्रवृत्तीचे इसम घेऊन तांदळे परत आला व घरात घुसून पुन्हा भिंतीचे नुकसान केले. या वेळीही बेकायदेशीर साहित्य टाकून बांधकाम सुरु करण्याचा प्रयत्न केला.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात ॲड. गोरक्षनाथ तांदळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विवेक घोडके, सोनिया घोडके, गोरख तांदळे व अन्य चार–पाच अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

